**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३४०/नाग/२०१०**

१. श्री सुशांत कुमार बॅनर्जी - **अपीलकर्ता**
प्लॉट नं.९, १८२२/अ, संत ज्ञानेश्वर कॉलनी, मानकापूर रिंग रोड, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, (मेयो) नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, (मेयो) नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०२/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २०/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तथापी त्यादिवशी सुनावणी झाली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख ०२/११/२०१० देण्यात आली. त्याप्रमाणे दि. ०२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. २६/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी इंदिरा गांधी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय (मेयो नागपूर) नागपूर यांचेकडे दि. २३/०१/२०१० रोजी मेडिकल लिगल केस मध्ये त्यांचेवर जो उपचार केलेला आहे त्या उपचाराच्या माहितीच्या कार्डची प्रत मागितलेली आहे.

३.	अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. ०७/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी न घेता दि. ३०/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार एम. एल. सी. केस मध्ये वैद्यकीय उपचार केलेल्या केस अंतर्गत नोंदणी क्र. ८४३ नुसार जो औषधोपचार आकस्मिक विभागात करण्यात आला आहे त्या संबंधितांच्या नोंदीच्या नोंद पुस्तिकेची छायांकित प्रत त्यांचेकडे दि. ३०/०८/२००८ च्या पत्रान्वये पोस्टाने पाठविल्याचे सुनावणीत नमूद केले आहे.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील त्यांचेकडे दाखल केलेल्या अपीलाच्या संदर्भात कोणतीही सुनावणी न घेता अपीलकर्ता यांना निर्णय दिला नाही. किंवा त्यांना माहितीही प्राप्त झाली नाही.

५.	प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने जनमाहिती अधिकारी डॉ. एस. एम. खान हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचे अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल झालेल्या अपीलानुसार सकृतदर्शनी अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना देण्याबाबतचा निर्णय घेतला म्हणून सदर अपीलाची सुनावणी न घेता प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे दि. ३०/०८/२०१० च्या पत्रान्वये पोस्टाने अपीलकर्ता यांना एम. एल. सी. केस अंतर्गत नोंदणी क्र. ८४३ नुसार बाहय रुग्ण विभागात उपचार घेतले असल्याने त्यांचा नोंदणी पेपर हा रुग्णालयाकडे राहत नाही. परंतू जो औषधोपचार आकस्मिक विभागात करण्यात आला त्यासंबंधीत नोंदीच्या नोंद पुस्तिकेची छायाप्रत अपीलकर्ता यांना पोस्टाने पाठविण्यात आली आहे असे कळविलेले आहे.

६.	अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे नमूद केले की, त्यांना अशी कोणत्याही प्रकारची माहिती पोस्टाने प्राप्त झाली नाही. तसेच त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीसाठी बोलाविले नाही किंवा सुनावणी घेतली सुध्दा नाही. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपीलाची सुनावणी घेणे आवश्यक होते त्यामुळे अशी कार्यवाही अपीलीय अधिकारी यांनी केलेली नाही. त्यामुळे भविष्यात

अपीलीय अधिकारी यांनी माहितीच्या अर्जाखालील अर्जाची सुनावणी घेवून व संबंधितांचे म्हणणे ऐकून घेवून निर्णय घेण्याबाबत समज देण्यात येत आहे. तथापी यानंतर याची पूनरावृत्ती झाल्यास आयोगाकडून याबाबत संबंधितांविरुध्द प्रशासकीय कार्यवाहीची शिफारस करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच माहितीच्या अधिकाराखालील अर्जाप्रमाणे त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर माहिती अधिकारान्वये शास्तीची कार्यवाही करण्यात यावी असे आग्रही प्रतिवादन अपीलकर्ता यांनी केले.

वरील बाबींवरुन असे दिसून येते की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून त्यांनी दि. ३०/०८/२०१० च्या पत्राप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती पाठविण्याचा निर्णय घेतला असता तर अधिक संयुक्तिक झाले असते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सुनावणीसाठी बोलविले नाही. तसेच अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. ३०/०८/२०१० च्या पत्रान्वये जी माहिती पाठविलेली आहे ती त्यांना अद्याप मिळालेली नाही. म्हणून अपीलकर्ता यांना पुन्हा दि. ३०/०८/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती देणे संयुक्तिक राहिल. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांचे दि.३०/०८/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती हा निर्णय मिळाल्यापासून पुन्हा विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठविण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील )
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. १३५२/नाग/२०१०

१. श्री राजकुमार देवीलाल ठाकरे - **अपीलकर्ता**
मु. मंगेझरी पो. सुकडी (डाक)
ता. तिरोडा जि. गोंदिया

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी - **उत्तरवादी**
गोंदिया
ता. जि. गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया

## अपील क्र. १३५३/नाग/२०१०

४. श्री मिताराम आत्माराम सराटे - **अपीलकर्ता**
मु. मंगेझरी पो. सुकडी (डाक)
ता. तिरोडा जि. गोंदिया

**(आदेश पारित दिनांक ११/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १६/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र. १३५२/नाग/२०१० व अपील क्र. १३५३/नाग/२०१० ही दोनही द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २३/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता व

उत्तरवादी हजर होते परंतू त्यांना सुनावणीची पुढील तारीख ११/११/२०१० देण्यात आली. त्याप्रमाणे दि.११/११/२०१० च्या सुनावणीस दोन्ही अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. सदर दोनही अपीलांमध्ये उत्तरवादी एकच आहेत.

२. सदर दोन्ही अपीलांमध्ये अपीलकर्ता यांनी दि. ०१/०७/२०१० रोजी उपविभागीय अधिकारी गोंदिया तथा जनमाहिती अधिकारी उपविभागीय कार्यालय (राजस्व विभाग) गोंदिया यांचेकडे मौजा कोडेबर्रा येथील काबीलकास्त जमीन गट नं. ९० आराजी १.१० हे. आर. जमिन सरकार जमा करण्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तसेच मौजा कोडेबर्रा येथील गट नं. १०५ आराजी ०.९१ हे. आर. आणि गट नं. १५८ आराजी ०.९५ हे. आर. सरकार जमा झाली किंवा नाही अशी माहिती अपीलकर्ता यांना पाहिजे होती.

३. जनमाहिती अधिकारी उपविभागीय कार्यालय गोंदिया हे सुनावणीस उपस्थित असून त्यांनी युक्तिवादात सांगितले की, कोडेबर्रा येथील जमीन गट नं. ९० आराजी १.१० हे. आर. श्री सोनू पटले रा. करटी यांना वाटप करण्यात आली होती. सदरहु जमीन धारकाने शासकीय जमीन वाटपाच्या अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे सदरची जमीन महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ व त्या अंतर्गत नियम १९७१ चे कलम १५ (२) (१) नुसार कोडेबर्रा येथील जमीन गट नं. ९० आराजी १.१० हे. आर. जमीन शासन जमा करण्याचे आदेश दि. ११/१०/२०१० रोजी काढलेले आहेत. तसेच दुसऱ्या प्रकरणात मौजे कोडेबर्रा त.सा.क. ११ ता. तिरोडा जि. गोंदिया येथील काबीलकास्त जमीन गट नं. १०५ आराजी ०.९१ हे. आर. आणि गट नं. १५८ आराजी ०.९५ हे. आर. जमीन श्री मारु सुखराम मडावी, रा. कोडेबर्रा यांना वाटप करण्यात आली होती. सदरहु जमीनधारकाने शासकीय जमीन वाटपाच्या अटी व शर्तीचा भंग केल्यामुळे सदरची जमीन महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्या अंतर्गत नियम १९७१ चे कलम १५ (२) (१) नुसार मौजे कोडेबर्रा येथील जमिन गट नं. १०५ आराजी ०.९१ हे.आर. व गट नं. १५८ आराजी ०.९५ हे.आर. जमीन शासन जमा करण्याचा आदेश दि. ११/१०/२०१० रोजी निर्गमित केला आहे. सदरची माहिती दोनही अपीलार्थींना दि. ०९/११/२०१० च्या पत्रान्वये दिलेली असून ती माहिती दोनही अपीलार्थींना मिळाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी दाखविली. तसेच दोनही अपीलार्थींना सदरची माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. १३५०/नाग/२०१०

१. श्री मनोहर धकाते - **अपीलकर्ता**
अंचलेश्वर वार्ड चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर -४४२-४०२

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी - **उत्तरवादी**
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड,
सिव्हिल लाईन्स् नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष -१३ - **उत्तरवादी**
प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड,
सिव्हिल लाईन्स् नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०२/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर होते व उत्तरवादी हजर होते म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख दि.०२/११/२०१० देण्यात आली. दि. ०२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर असून लेखी निवेदन दिले आहे. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत..

२. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०७/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य यांचेकडे महाराष्ट्र राज्य नागपूर यांच्या आस्थापनेवर असलेल्या कर्मचारी / अधिकारी यांचेबाबत एकूण ८ मुद्यांवर माहिती अधिकाराखाली माहिती मागितलेली आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.०७/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. ३०/०८/२०१० रोजी प्रथम अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहणेबाबत कळविले होते. परंतू अपीलकर्ता हे सुनावणीस हजर झाले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि.०१/०९/२०१० रोजी देवून त्यामध्ये असे नमूद केले की, अपीलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे या अपीलावर वेगळी कार्यवाही करण्याची आवश्यकता वाटत नाही. परंतू अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाचा निर्णय मान्य नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा मला पाहिजे असलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारात केलेल्या अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी खालीलप्रमाणे एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

१. वर्ग ४ मध्ये ३ वर्षाचा कालावधी न होता तसेच जेष्ठ असलेल्या वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांना डावलून लिपीक या पदावर पदोन्नती दिलेल्या कर्मचाऱ्यांची यादी.

२. वर्ग ४ मधून सरळ सेवा लेखापाल म्हणून नियुक्ती दिलेल्या कार्यरत कर्मचाऱ्यांची यादी.

३. विभागीय परिक्षा उत्तीर्ण न केलेल्या लिपीक लेखापाल यांना पदोन्नती दिलेल्यांची यादी.

४. २८ मे २००१ नंतर अनुसूचित जमातीच्या कर्मचाऱ्यांकडून वैधता प्रमाणपत्र प्राप्त न करता पदोन्नती दिलेल्या अनुसूचित जमातिच्या कर्मचाऱ्यांची यादी.

५. जाती वैधता प्राप्त न करता मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना दिलेल्या पदोन्नतीची यादी (अनुसुचित जमातीचे कर्मचारी वगळून)

६. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यापूर्वी जाती वैधता प्रमाणपत्र न घेण्याबाबत शासनाच्या आदेशाची प्रत.

७. वन रक्षक या पदावर नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांचे लिपीक / लेखापाल या प्रवर्गात बदल केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी.

८. वन रक्षकांना लिपीक / लेखापाल या प्रवर्गात बदल करण्याबद्यल शासनाच्या परिपत्रकाची प्रमाणित प्रत.

५. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ यांनी अपीलकर्ता यांच्या दि. ०१/०७/२०१० च्या अर्जास अनुसरुन दि. १७/०८/२०१० च्या पत्रामधे याबाबत असे नमूद केले आहे की, अर्जदाराच्या प्रत्येक मुद्यांची माहिती त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध नसल्यामुळे ती तयार करुन त्यांना पाठविता येणे शक्य नाही. अर्जदाराच्या प्रत्येक मुद्यांतील माहिती ही सर्व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक बाबीं संबंधीत असल्यामुळे तशी माहिती त्यांच्या कार्यालयात तयार नाही. त्यामुळे जी माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही ती त्वरीत तयार करुन देता येणे शक्य नाही. तथापी अपीलकर्ता यांनी प्रत्येक मुद्यांच्या बाबत सर्व कर्मचाऱ्यांच्या ऐवजी काही कर्मचाऱ्यांची नावे देवून माहिती मागितल्यास त्या कर्मचाऱ्यांची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. मात्र त्यांनी वनविभागातील सर्वच कर्मचाऱ्यांची माहिती मागितलेली आहे ती त्यांना देता येणे शक्य नाही. कारण सदर मुद्यांच्या बाबतीत अद्यापपर्यंत माहिती तयार केलेली नाही तसेच कार्यालयात उपलब्ध नसलेली माहिती तयार करुन पाठविण्याची माहिती अधिकारात तरतुद नाही त्यामुळे प्रत्येक मुद्यांची माहिती देता येत नाही असे अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. १७/०८/२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना नेमक्या कोणत्या कर्मचाऱ्यांची माहिती पाहिजे आहे ती नावे जनमाहिती अधिकारी यांना कळवून माहिती उपलब्ध करुन घेता येईल. तथापी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीपैकी सद्यस्थितीत जनमाहिती अधिकारी यांचेकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१.  अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती पैकी सद्यस्थितीत त्यांचेकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती माहिती हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात विनामुल्य व्यक्तीशः किंवा पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३४९/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर -४४२-४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी<br>प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड,<br>सिव्हिल लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष -१३<br>प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड,<br>सिव्हिल लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/११/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर होते व उत्तरवादी हजर होते म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख दि.०२/११/२०१० देण्यात आली. दि. ०२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत..

२.  अपीलकर्ता यांनी दि.०१/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड, नागपूर यांचेकडे २ मुद्यांवर खालीलप्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते.

१.  अ. जाति अ. जमाति. वि.जा.भ.ज. विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग कर्मचाऱ्यांनी वैधता प्रमाणपत्र न दिल्यामुळे पदानवत (Reservation) केलेल्या कर्मचाऱ्यांची यादी.

२.  प्रधान मुख्य संरक्षक म.रा. नागपूर यांच्या आस्थापनेवर दि. ०१/०७/२०१० ला कार्यरत कर्मचाऱ्यांची प्रपत्रात.

| **अ.क्र.** | **कर्मचाऱ्यांचे नांव** | **पदनाम** | **वर्गवारी SC/ST/OBC etc.** | **वैधता प्रमाणपत्र प्राप्त /अप्राप्त** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |

३.  अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.०७/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. ३१/०८/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्ता यांना मुद्या क्र. १ च्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती पुरविण्यात आलेली असल्यामुळे मुद्या क्र. २ च्या अनुषंगाने आवश्यक ती माहिती या कार्यालयात येवून पाहण्याबाबत माहिती अधिकारी यांनी कळविलेली असल्यामुळे या अपीलावर वेगळया कार्यवाहीची आवश्यकता नाही. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय अपीलकर्ता यांना मान्य नसल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितिय अपील दि. १५/०९/२०१० रोजी दाखल केले आहे.

४.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांच्या अर्जातील दोन मुद्यांपैकी मुद्या क्र.१ ची माहिती त्यांना मिळाली आहे मात्र मुद्या क्र. २ ची माहिती त्यांना प्राप्त झाली नाही.

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि.०१/०७/२०१० चा माहिती अधिकाराचा अर्ज त्यांचेकडे दि. १७/०७/२०१० रोजी प्राप्त झाला असून त्या अर्जातील मुद्या क्र. १ ची माहिती दि. १२/०८/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली असून मुद्या क्र. २ ची माहिती ही तक्रारदार यांना विशिष्ट नमुन्यात पाहिजे आहे.

मात्र त्यांना दिलेल्या नमुन्यातील माहिती जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही म्हणून त्यांनी अपीलकर्ता यांना कळविले आहे की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या अंतर्गत अभिलेख्याच्या प्रती उपलब्ध करुन देण्याची तरतुद आहे परंतू माहिती तयार करुन पाठविण्याची तरतुद नाही. तथापी अपीलकर्ता यांना अर्जातील नमूद केलेल्या बाबींचे अभिलेख नियमातील तरतुदीनुसार पाहवयाची असल्यास उपलब्ध करुन देता येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांना मुद्या क्र. १ ची माहिती पुरविण्यात आलेली असून मुद्या क्र.२ बाबत ते कार्यालयात येवून माहिती पाहू शकतात. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. २ ची माहिती म्हणजे प्रधान मुख्य वनसंरक्षक नागपूर यांच्या आस्थापनेवर दि. ०१/०७/२०१० ला कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांची त्यांनी दिलेल्या नमुन्यात माहिती पाहिजे आहे मात्र नमुन्यात माहिती तयार करुन देण्याची तरतुद माहिती अधिकाराच्या नियमात नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ यांनी त्यांच्या कार्यालयात कर्मचाऱ्यांची माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे. त्याच स्वरुपात ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ यांनी त्यांच्या कार्यालयाकडे कर्मचाऱ्यांची माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३४८/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मनोहर धकाते<br>अंचलेश्वर वार्ड चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर -४४२-४०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी<br>प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड,<br>सिव्हिल लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | (i)जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष -७ (अ)<br>प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड,<br>सिव्हिल लाईन्स् नागपूर | | |
| ४. | (ii)जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष -१३<br>प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय, वनभवन, रामगिरी रोड,<br>सिव्हिल लाईन्स् नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर होते व दोनही उत्तरवादी हजर होते म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख दि.०२/११/२०१० देण्यात आली. दि. ०२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०६/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये खालीलप्रमाणे एकूण ९ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालय नागपूर येथे कार्यरत असलेले १) श्री एस. जी. गेडाम, कार्यालय अधिक्षक, २) श्री पी. पी. देव कार्यालय अधिक्षक, ३) श्री ए. जी. वाघमारे लेखापाल, श्री. एस. एम. चौधरी लेखापाल यांच्या बद्यलची खालील माहिती, लिपीक, लेखापालाच्या सरळ सेवा भरती बाबतची नियमावलीची प्रत १९८७ पूर्वीची सह व पदोन्नतीच्या वेळेस जाती वैधता प्रमाणपत्र न घेण्याबाबत शासनाचे आदेशाच्या प्रमाणित झेरॉक्स प्रति पुरविण्यात यावे.

१) कमचाऱ्यांचे नाव. २) मूळ नियुक्तीच्या कार्यालयाचे नाव मुळ नियुक्तीची तारीख व पद ४) प्रवर्ग ५) पहिल्या दुसऱ्या तिसऱ्या पदोन्नतीची तारीख व प्रवर्ग ६) सरळ सेवा नियुक्ती आहे किंवा नाही. असल्यास शासन निर्णयात तरतुद असल्याबाबत परिपत्रक/ नियमावलीची झेरॉक्स प्रत पुरवावी. ७) मुळ नियुक्ती अन्य विभागात झाली असल्यास वन विभागीय परिक्षा उत्तिर्ण करणे बंधनकारक आहे किंवा नाही (८) मागास वर्गीय प्रवर्गात नियुक्ती /पदोन्नती झाली असल्यास जाती वैधता प्रमाणपत्र सादर केले किंवा नाही नसल्यास सादर न करण्याबाबत शासनाचे आदेश पुरवावे. ९) प्रत्येक पदोन्नतीसाठी झालेल्या निवड समितीच्या कार्यवृत्तांची प्रमाणित प्रत पुरवावी. अशी माहिती मागितलेली असून सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पूर्ण न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १२/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. ३०/०७/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली व प्रथम अपीलाच्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी-१३ यांना अपीलकर्ता यांना दि.१२/०७/२०१० च्या नमूद केलेल्या अर्ज क्रमांक आहस-४२/२०१० दिनांक १/६/२०१० मध्ये नमूद केलेल्या ४ अधिकाऱ्यांची /कर्मचाऱ्यांची माहिती, उपलब्ध कागपत्रांसह/दस्तऐवजांसह आज दिनांक ३०/०७/२०१० पासून १० दिवसांचे आंत अपीलकारास पुरविण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. परंतू

प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे पूर्ण माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयातील आदेशा नंतर सुध्दा अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाली नाही.

जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिक्षक कक्ष - ७ यांनी अपीलकर्ता यांना दि. २५/०६/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्या कार्यासनाशी संबंधीत कार्यालय अधिक्षक या संवर्गाबाबत सरळसेवा भरती बाबत नियमावलीची १० जून १९८५ ची प्रत तसेच एस. जी. गेडाम, श्री पि. पि. देव कार्यालय अधिक्षकांची कार्यालय अधिक्षक या पदावर पदोन्नतीसाठी निवड केलेल्या समितीचा कार्यवृत्तांची प्रत उपलब्ध करुन देणेसाठी या कार्यालयाचे संदर्भीय पत्रान्वये अपीलकर्ता यांना झेरॉक्स शुल्क व टपाल खर्च मागविण्यात आले होते. त्या अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २५/०६/२०१० रोजी पाठविलेले रुपये ५२/- मनीऑर्डरद्वारे जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयास प्राप्त झाले असून त्याबाबत मनीऑर्डरची पावती आणि दस्तऐवज अपीलकर्ता यांना पाठविलेली आहे. असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.२५/०६/२०१० रोजीच्या पत्रात नमूद केले आहे.

५. अपीलकर्ता यांनी याबाबत सांगितले की, त्यांना वनविभाग लिपीक व लेखापालाच्या सरळसेवा भरतीबाबतची नियमावलीची प्रत १९८७ पूर्वीची पाहिजे आहे त्यावर जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ यांनी सांगितले की, १९८७ पूर्वीची लिपीक लेखापाल यांच्या सरळसेवा भरतीची नियमावलीची प्रत त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. त्याचे कारण देतांना ते म्हणाले की, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांचे कार्यालय महाराष्ट्र राज्य पूणे येथे कार्यरत होते आता ते कार्यालय नागपूर येथे स्थांनांतरीत करण्यात आले आहे, त्यामुळे तेथील सर्व अभिलेखे नागपूर कार्यालयात आणण्यात आले आहे. मात्र त्यावेळचे काही अभिलेखे सद्यपरिस्थितीत दिसून येत नाही. व त्यांनी शोध घेवूनही १९८७ पूर्वीची लिपीक लेखापाल यांची सरळसेवा भरतीची नियमावलीची प्रत कार्यालयात उपलब्ध नाही. म्हणून ही वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना कळविणे संयुक्तिक होईल. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती बाबतच्या माहिती संदर्भात त्या कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तिकेच्या झेरॉक्स प्रत त्यांना उपलब्ध करुन दिल्या आहेत असेही जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

कक्ष-१३ यांनी सुनावणीत स्पष्ट केले आहे. तसेच सेवापुस्तिकेच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्ता यांनी उपलब्ध झाल्याचे मान्य केले त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी कक्ष-१३ यांनी १९८७ पूर्वीची लिपीक व लेखापाल सरळसेवा भरतीची नियमावलीची प्रत उपलब्ध नाही असे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. १३३८/नाग/२०१०

१. श्री शिवशंकर हुसेन भिवगडे - **अपीलकर्ता**
रेल्वे स्टेशन रोड. कन्हान
ता. पारशिवनी जि. नागपूर -४४१ ४०१

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक - **उत्तरवादी**
नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी - **उत्तरवादी**
कामठी
ता. कामठी जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०२/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २२/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १३/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर होते व दोनही उत्तरवादी हजर होते परंतू सदरच्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख दि.०२/११/२०१० देण्यात आली. दि. ०२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. ०८/०७/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपविभागीय अधिकारी पोलीस उपविभाग कार्यालय, कामठी यांचेकडे गैरअर्जदार हेमराज पुंजाराम माहोरे व देवराव पुंजाराम माहोरे कन्हान यांचेविरुध्द फसवणूक, लुबाडणी, धोकाधडी, आर्थिक नुकसान व मानसिक त्रास दिल्याबद्यल दि.२२/०६/२०१० रोजी पोलीस स्टेशन कन्हान, यांचेकडे एफ.आय.आर. दर्ज केली होती. त्या अर्जाची माहिती अद्यापपर्यंत मिळाली नाही अशी अपीलकर्त्याने माहिती मागितलेली दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक कामठी यांनी चुकीची माहिती दिली व दिवाणी कोर्टात दाद मागण्याचे कळविले आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक कामठी यांच्या निर्णयाविरुध्द प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक ग्रामिण नागपूर जिलहा नागपूर यांचेकडे दि.११/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

४.	प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर यांनी दि.०५/०९/२०१० रोजी निर्णय दिला असून अपीलकर्ता यांना त्यांच्या प्लॉट बद्यल दिवाणी कोर्टात अपील सुरु आहे. सदर वादग्रस्त प्लॉट बद्यल गैरअर्जदार हेमराज पुंजाराम माहोरे व देवराव पुंजाराम माहोरे दोनही रा. कन्हान यांचेविरुध्द दिलेली तक्रार ही दिवाणी स्वरुपाची असल्यामुळे आपण दिवाणी कोर्टात दाद मागण्याची समज ठाणेदार कन्हान यांनी दि. ०७/०८/२०१० रोजी लेखी स्वरुपात दिली आहे. तसेच जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कामठी यांनी त्यांचे पत्र क्र. २१५९/१० दि. ०९/०८/२०१० अन्वये माहिती पुरविलेली आहे. ठाणेदार कन्हान यांनी दिवाणी कोर्टात दाद मागण्याची दिलेली लेखी समज बाबतचे पत्राची छायांकित प्रत सोबत जोडून आपणास पुरविण्यात येत आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते.

प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.१७/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

५.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, हेमराज पुंजाराम माहोरे व देवराव पुंजाराम माहोरे रा. कन्हान या दोघांनी धोकाधडी करुन प्लॉट विकुन माझी फसवणुक केली आहे त्याबाबत पोलीस स्टेशन कन्हानकडे तक्रार करुन त्यांचेविरुध्द एफ.आय.आर. दर्ज करण्याबाबतचे पत्र लिहिले होते परंतू अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही पोलीस स्टेशन तर्फे करण्यात आलेली नाही.

६.	जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक कामठी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या अनुषंगाने दि. ०९/०८/२०१० च्या पत्रान्वये पोलीस स्टेशन कन्हान यांना लेखी अहवाल व लेखी सुचना देवून अपीलकर्ता यांना पाहिजे असलेल्या माहितीच्या कागदपत्रांच्या एकूण ५ प्रती  उपलब्ध करुन दिल्या मात्र त्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही. अपीलकर्ता यांच्या प्लॉटबद्यल जी तक्रार केली आहे त्याबाबत दिवाणी कोर्टात केस सुरु आहे, सदर वादग्रस्त प्लॉट बाबतचा निकाल श्री नामदेव परडके यांच्या बाजूने लागला आहे असे अपीलकर्ता यांनी  दि. २९/०५/२०१० च्या बयानात सांगितले आहे. तेव्हा अपीलकर्ता यांनी गैरअर्जदार नामदेव परडके, हेमराज पुंजाराम माहोरे व देवराव पुंजाराम माहोरे रा. कन्हान यांचेविरुध्द दिलेली तक्रार ही दिवाणी स्वरुपाची असल्याने त्यांचेविरुध्द दिवाणी कोर्टात त्यांनी दाद मागावी म्हणून अपीलकर्ता यांना दि. ०७/०८/२०१० च्या पत्रान्वये लेखी सूचना दिली आहे.

७.	प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर यांनी देखील अपीलकर्ता यांनी त्यांचेकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलाच्या संदर्भात अपीलकर्ता यांच्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती दि. ०५/०९/२०१० च्या पत्रान्वये ठाणेदार कन्हान यांना दि. ०७/०८/२०१० रोजीचे दिवाणी कोर्टात दाद मागण्याबाबतचे पत्र अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिल्याचे अपीलकर्ता यांना कळविले आहे. त्याबाबतची कागदपत्रे त्यांनी सुनावणीचेवेळी आयोगासमोर दाखल केली आहेत. यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांची तक्रार दिवाणी स्वरुपाची असल्यामुळे याबाबत दिवाणी कोर्टात अपीलकर्ता यांनी  दाद मागणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३९६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रविंद्र तुकाराम हिवाळे<br>गौतम नगर, भिवसन खोरी, काटोल रोड,<br>C/o, बिसन किराणा दुकान, पो. वाडी, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामिण)<br>इंदोरा लाल गोदाम क्र.९, कामठी रोड, इंदोरा, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी<br>प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामिण)<br>इंदोरा लाल गोदाम क्र.९, कामठी रोड, इंदोरा, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक १६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे टॅक्स रिकव्हरी ऑफिसर श्री घोडमारे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी परिवहन कार्यालय नागपूर (ग्रामिण) यांचेकडे दि. २१/०८/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये परिशिष्ट अ प्रमाणे MH40 E 5165 टी व्ही एस स्टार डिलक्स ही गाडी ICICI बॅंकेकडून फायनान्स करुन ए. के. गांधी मार्फत विकत घेतली होती. सदर गाडी घरुन चोरीस गेली असून सध्या कोणाच्या ताब्यात आहे. तसेच ती गाडी कोणाच्या नावावर घेतली आहे त्या बाबतचा तपशिल मागितलेला दिसून येतो.

३. अपीलकर्ता यांच्या अपील अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना दि. २५/०८/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली दिसून येते. परंतू या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक विभाग यांचेकडे दि. १३/०९/२०१० च्या अर्जान्वये प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निकाली काढले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि. २१/०८/२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन त्यांची गाडी क्र. MH40 E 5165 ची माहिती मागितली होती. त्यांनी सदरहु गाडीसाठी ICICI बॅंकेकडून रु. २३०००/- चे कर्ज काढले होते त्या संपूर्ण कर्जाची परतफेड त्यांनी केली होती. असे असतांनाही त्यांच्या मुलावर कुणीतरी अज्ञातांनी हमला करुन त्यांचे घरुन ती गाडी चोरुन नेली. त्यामुळे सदर गाडी चोरीस गेल्यामुळे ती कोणाच्या ताब्यात आहे व ती कोणी विकत घेतली असल्यास त्या विकत घेणाऱ्याचे नाव इ. चा तपशील त्यांनी मागितला होता. त्या अर्जास अनुसरुन अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.२५/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविलेली आहे. मात्र सदरच्या माहितीमध्ये गाडी कोणाच्या ताब्यात आहे याचा तपशील त्यांना उपलब्ध झाला नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकाऱ्यांतर्फे अर्जदारास माहिती मिळाल्यास्तव प्रथम अपील निकाली काढले . म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांच्या अभिलेखामध्ये जशी उपलब्ध आहे तशीच दि. २५/०८/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या उपलब्ध केलेल्या माहितीवरुन सध्या वाहनधारक म्हणून अपीलकर्ते श्री रविन्द्र तुकाराम हिवाळे यांच्याच नावावर ती गाडी असून भाडे खरेदी करार आय.सी.आय.सी.आय. बँक व अपीलकर्ता यांच्यात झाला आहे. अपीलकर्ता यांनी ICICI बँकेकडून कर्ज घेतले आहे मात्र अपीलकर्ता व आय.सी.आय.सी.आय. बँक यांच्या कर्ज व्यवहारातील माहिती त्यांच्या कार्यालयातील अभिलेखामध्ये उपलब्ध नाही. तसेच आय.सी.आय.सी.आय. बँकेशी अपीलकर्ता यांचा जो करार झालेला आहे तो वैयक्तिक करार आहे. त्यातील अटी व शर्ती परिवहन कार्यालयात उपलब्ध नसतात. तथापी मोटर वाहन कायदा तरतुदीनुसार त्यांच्या कार्यालयातील अभिलेखावर अर्जदार नोंदणीकृत मालक व धनको यांच्यात करार आहे एवढीच नोंद असते. म्हणून अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना देण्यात आलेली आहे.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर (ग्रामिण) यांचे वतीने हजर झालेले श्री गोतमारे, टॅक्स रिकव्हरी ऑफिसर यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.२५/०८/२०१० च्या पत्रान्वये परिवहन कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहिती रेकॉर्डवरुन अपीलकर्ता यांच्या गाडीची संपूर्ण माहिती दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील खारीज केले आहे.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी, प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. २५/०८/२०१० च्या पत्रान्वये संपुर्ण तपशिल पाठविलेला आहे. सदर माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाली आहे. मात्र सदरची गाडी चोरीस गेली असल्यामुळे ती सध्या कोणाच्या ताब्यात आहे यासाठी अपीलकर्ता यांनी संबंधित पोलीस स्टेशनकडे तक्रार दाखल करणे संयुक्तिक होईल. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या गाडीबाबतची संपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३९७/नाग/२०१०</u>**

१. श्री रविंद्र तुकाराम हिवाळे - **अपीलकर्ता**
गौतम नगर, भिवसन खोरी, काटोल रोड,
C/o, बिसन किराणा दुकान, पो. वाडी, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त - **उत्तरवादी**
परिमंडळ क्रमांक २, नागपूर शहर
ता. जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त - **उत्तरवादी**
सदर विभाग, नागपूर शहर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक १६/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक १६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २१/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सदर विभाग नागपूर यांचेकडे परिशिष्ट 'अ' प्रमाणे माहिती मागितलेली आहे त्यात त्यांनी त्यांचा मुलगा सौरभ रविंद्र हिवाळे याला गिट्टीखदान पोलीसांनी दि.२२/०२/२०१० रोजी अटक केलेला होता अटक

करतांना त्याला कोणत्या अपराधाखाली अटक केली आहे याची माहिती मागितलेली असून सदर माहिती शिघ्र टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या नंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांचा मुलगा सौरभ रविंद्र हिवाळे याला दि. २२/०२/२०१० रोजी सावनेर पोलीस स्टेशन कडून गड्डीगोदाम पोलीस स्टेशन अंतर्गत अटक करण्यात आली होती. आणि तसे त्यांनी माहिती अर्जाच्या परिशिष्ट 'अ' मध्ये सुध्दा नमूद केले आहे. मात्र अटक करतांना त्याने कोणता गुन्हा केला आहे याबाबत काहीच न सांगता व पुरावा न दाखवता अटक केली. या कारणास्तव अपीलकर्त्याने माहिती अर्जाखाली अर्ज करुन माहिती मागितली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अवलोकन केले असता सदर तक्रार ही गड्डीगोदाम पोलीस स्टेशन मधील घटना असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०६/०८/२०१० च्या पत्रात नमुद केले आहे. तसेच गड्डीगोदाम पोलीस स्टेशन हे नागपूर शहरात अस्तीत्वातच नाही तेव्हा अपीलकर्ता यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे याचा स्पष्ट अर्थबोध होत नाही. तरी आपणास कोणत्या पोलीस स्टेशन संबंधित व कोणती माहिती पाहिजे याकरिता आपणास पत्र प्राप्त झाल्याचे ७ दिवसांचे आत या कार्यालयात कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष येवून भेटावे अन्यथा आपला अर्ज निकाली काढण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०६/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.२ नागपूर शहर यांनी दि. ०२/०९/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून असा निर्णय दिला की, अपीलकर्ता यांना कोणत्या पोलीस स्टेशन संबंधित माहिती हवी आहे आणि नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याचा स्पष्ट अर्थबोध होत नाही म्हणून प्रथम अपील हे निकाली काढण्यात आले.

प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे म्हणणे मांडल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचा दि. २१/०७/२०१० च्या माहितीच्या अर्जात मागितलेल्या माहितीची स्पष्टोक्ती होत नाही व त्यातून कोणताच अर्थबोध होत नाही. म्हणून अपीलकर्ता यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे त्यासाठी त्यांनी प्रत्यक्ष संबंधित कार्यालयात जावून नेमकी कोणती माहिती त्यांना पाहिजे आहे ती माहिती त्यांना प्राप्त करुन देणे योग्य व संयुक्तिक होईल म्हणून त्यासाठी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात अपीलकर्ता यांनी प्रत्यक्ष जावून रेकॉर्डस्चे निरिक्षण करुन त्यांना हवी असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी. आयोगापुढील सुनावणीत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची संमती दर्शविली तसेच अपीलकर्ता यांनी सुध्दा जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन घेण्याची संमती दर्शविली. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी रेकॉर्डचे निरिक्षण करुन घेण्यासाठी कार्यालयात बोलवावे आणि अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित होवून रेकॉर्डस्चे निरिक्षण करुन घ्यावे. अपीलकर्ता यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे ती माहिती जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. १३९८/नाग/२०१०

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रविंद्र तुकाराम हिवाळे<br>गौतम नगर, भिवसन खोरी, काटोल रोड,<br>C/o, बिसन किराणा दुकान, पो. वाडी, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नागपूर मध्यवर्ती कारागृह नागपूर<br>ता. जि. नागपूर. | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक १६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने सहाय्यक जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १७/०८/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कारागृह उपमहानिरिक्षक यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन त्या सोबतच्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे माहितीचा सविस्तर तपशील व त्याबाबतच्या प्रती मिळणेबाबत माहिती मागितलेली असून त्या परिशिष्टात त्यांनी नमूद केले की, मी दि.१६/११/२००६ पासून दि. ०९/०९/२००९ पर्यंत कारागृहात बंदीस्त होतो माझी सुटका दि. ०९/१०/२००९ ला झाली सुटकेच्या वेळी मी कारागृहात रु.२०००/- दंड भरला होता. दंडाच्या बाबतची पावती व संपूर्ण तपशील तसेच कारागृहामार्फत दंडाची रक्कम कोणत्या न्यायालयात जमा केली तसेच अपील क्र. १९७-१९८/२००८ हे सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दाखल झाले होते. त्यांच्या निर्णयाची दि. ०२/०८/२०१० ची प्रत न्यायालयाने आपल्या कार्यालयात पाठविली त्याची प्रत मिळावी. अशाप्रकारची माहिती मागितलेली असून सदर माहिती शिघ्रपोस्टने घेणार असे नमूद केले आहे.

३. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा स्वीय सहाय्यक कारागृह उपमहानिरीक्षक पुर्व विभाग नागपूर यांनी दि.३०/०८/२०१० रोजी सदर माहिती या कार्यालयाशी संबंधीत नसल्यामुळे व सदर माहिती ही नागपूर मध्यवर्ती कारागृहातील न्याय विभागाशी संबंधीत असल्यामुळे अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचेकडे मागण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. व दि.३०/०८/२०१० च्या पत्राची एक प्रत अधीक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांना सुध्दा पाठविलेली दिसून येते.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा सत्र न्यायालय, नागपूर यांनी दि. २९/०९/२०१० च्या पत्रामध्ये नमूद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या मुद्या क्र. २ ची माहितीमध्ये रक्कम कोणत्या तारखेला न्यायालयात जमा केली हे दिलेले नाही तसेच रक्कम जमा केल्याची पावती जोडलेली नाही त्यामुळे मुद्या क्र. २ ची माहिती पुरवू शकत नाही असे अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा व सत्र न्यायालय, नागपूर यांनी दि.२९/०९/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह यांचेकडे दि. २९/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी आयोगास दि.१६/११/२०१० रोजी खुलासा सादर केला आहे. त्या खुलाश्यामध्ये त्यांनी पुढीलप्रमाणे नमूद केले आहे.

सिध्ददोष बंदी क्रमांक सी/७१२१ रविन्द्र तुकाराम हिवाळे यास सन्मा. ३ रे अतिरिक्त सत्र न्यायालय नागपूर यांचे कोर्टाचे दिनांक १६/०२/१९९१ अन्वये सेशन केस नं. ३४०/१९९० कलम ४९८ (अ) ३०६ भादवि मध्ये ४-०-० सश्रम कारावास व दंड रु २०००/- न भरल्यास २ महिन्याची अतिरिक्त शिक्षा देण्यात आली होती. सदर बंद्याने दंड रु २०००/- कोर्टात भरला नाही. सदर बंदी दिनांक २७/०२/१९९१ रोजी अपील जामीनवर कारागृहातून मुक्त झाला होता. सदर बंद्याने वरील आदेशाविरुध्द सन्मा. उच्च न्यायालय नागपूर येथे क्रिमीनल अपील दाखल केले होते. क्रिमीनल अपील क्र. ५३/९१ अन्वये बंद्यास वरील शिक्षा रद्द करुन ३०६ भादवि अन्वये ६ वर्ष शिक्षा व दंड रु २०००/- न भरल्यास दोन महिने शिक्षा देऊन दिनांक १६/११/०६ अन्वये उर्वरीत शिक्षा भोगण्यासाठी कारागृहात दाखल झाला. बंद्याने दंड रु २०००/- कोर्टात भरला नाही.

सदर बंद्याचे विनंतीनुसार सर्कल क्रं.-३ (छोटीगोल) विनंती क्र. ३६१ दि.२८/९/२००९ अन्वये दंड भरण्याबाबत विनंती मंजूर झाल्याने बंद्याच्या खाजगी रक्कमेतून दंडाची रक्कम रु २०००/- वसूल करुन चलान क्र. ७४ दिनांक ८/१०/२००९ रोजी सन्मा. कोर्टाचे लेखाशिर्षामध्ये बँकेमध्ये जमा करण्यात आलेली आहे.

सदर बंद्याने वरील शिक्षेविरुध्द सन्मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे अपील दाखल केले होते. सन्मा. सर्वोच्च न्यायालय नवि दिल्ली यांचेकडील क्रि. अपील नं. १४१९ व १४२०/२०१० दिनांक २/८/२०१० अन्वये बंद्यास सन्मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दिलेली शिक्षा रद्द बादल ठरवून मा. अतिरिक्त सत्र न्यायालयाने दिलेली शिक्षा कायम ठेवून त्वरित मुक्त करण्याचे आदेश दिले आहेत. व सदरील आदेशाबाबत मा. ३ रे अतिरिक्त सत्र न्यायाधिश नागपूर यांचे दि. ४/८/२०१० चे फेर आदेश प्राप्त झाले आहे. परंतू सदर बंद्यास कारागृहात माफी ७५१ दिवस माफी देवून व दंड भरुन दिनांक ८/१०/२००९ रोजी या पूर्वीच कारागृहातून मुक्त केले आहे.

सदर बंद्याने माहितीचा अधिकार अधिनियम -२००५ अन्वये दंड रु. २०००/- भरला त्याची पावती क्रमांक व दंडाची रक्कमेचा भरणा कुठे केला त्याचा तपशिल व सन्मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयाची प्रत मागितलेली होती.

त्या अनुषंगाने सदर बंद्यास दिनांक ८/९/२०१० रोजी प्रत्यक्ष संपूर्ण कागदपत्रांची छायांकित प्रत देण्यात आलेली आहे. सदर बंद्याने दंडाची रक्कम रु. २०००/- या कार्यालयास मागितलेली आहे. परंतू सदर बंद्याचे दंडाची रक्कम रु. २०००/- पावती क्रमांक १३०६८ दि. ३०/९/२००९ दंड वसूल करुन सन्मा. न्यायालयाचे लेखाशिर्षामध्ये बँकेमध्ये जमा करण्यात आलेली असल्याने पुढील आदेशासाठी सन्मा. ३ रे अतिरिक्त सत्र न्यायालय, नागपूर यांचे कोर्टात मार्गदर्शन मागितले होते. त्या अनुषंगाने सन्मा. ३ रे अतिरिक्त सत्र न्यायालय, नागपूर यांचे कोर्टाचे आदेश क्र. ६००/जि.न्याय-३ /२०१० दि.८/११/२०१० अन्वये बंद्यास रु २०००/- परत करण्याचे आदेश दिले आहेत. सदरील रक्कम कोषागारातून आहरीत करुन सदर रकमेचा धनादेश प्राप्त होताच बंद्यास देण्यात येईल.

६. वरीलप्रमाणे संपूर्ण माहिती प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी आयोगाकडे सादर केलेल्या खुलाशात नमूद करुन आयोगापुढे बाजु मांडलेली आहे. म्हणून वरील सर्व मुद्दे लक्षात घेवून असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र. १३५७/नाग/२०१०

१. श्री श्रीहरी रघुनाथजी गुंडगे - **अपीलकर्ता**
मु. पो. मोहपा
ता. कळमेश्वर जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी नागपूर - **उत्तरवादी**
ता. जि. नागपूर.

३. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य - **उत्तरवादी**
कै.वा.भुरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था, कोहळी
ता. कळमेश्वर जि. नागपूर.

**(आदेश पारित दिनांक ११/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २३/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि.१४/१०/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. जनमाहिती अधिकारी गैरहजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. परंतू त्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख दि. ११/११/२०१० देण्यात आली. दि.११/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने प्र. अधिकारी श्री एच.व्ही ठाकरे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि.१३/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालच्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य कै. वा. भुरे औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कोहळी यांना खालीलप्रमाणे एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

अ. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ट्रेड निहाय किती विषयात प्रवेश देता येतो व आपल्या प्रशिक्षण संस्थेत किती प्रवेश क्षमता आहे.

ब. ट्रेड निहाय प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्क किती देण्यात येते याबाबत माहिती देण्यात यावी.

क. सन २००९-१० व सन २०१० - ११ या वर्षी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क व प्रवेश शुल्क बाबत व डोनेशनबाबत माहिती देण्यात यावी. सन २०१०-११ या वर्षात प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचा संपूर्ण पत्ता व नावं.

ड. सन २००९-१० व २०१०-११ या वर्षी प्रवेश फिटर ट्रेडसाठी घेतलेले शिक्षण शुल्क, डोनेशनच्या पावत्या.

इ. सन २००९-२०१० या वर्षीचे आपल्या संस्थेचे ऑडीट स्टेटमेंट व कै. वा. भुरे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे ऑडीट स्टेटमेंट.

सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांनी दि.१६/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती पाठविलेली आहे. परंतू सदरच्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १७/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी नागपूर यांनी दि.०२/०९/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला असून त्यात त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत आपण औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, कोहळी, त. कळमेश्वर जि. नागपूर या संस्थेच्या प्रवेशासंबंधी माहिती मागितली असता, राज्य माहिती आयोग, नागपूर खंडपीठ नागपूर यांनी त्यांचे आदेश क्र. रामाआ/ख/१७५/१०/२०१०

तक्रार दि. २६/०८/२०१० अन्वये एका प्रकरणात सदर संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. त्यामुळे त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ हा लागू होत नाही असा निर्णय दिलेला आहे. सदर पत्राची प्रत आपणास पाठविण्यात येत आहे. तेव्हा सदर संस्थेला आपण माहितीच्या अधिकारात मागितलेली माहिती ही संयुक्तिक वाटत नाही असे अपीलकर्ता यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले.

५. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य कै. वा. भुरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोहळी, ता. कळमेश्वर जि. नागपूर यांचेकडे दि. १३/०७/२०१० च्या माहिती अधिकाराच्या अर्जान्वये एकूण ५ पाच मुद्यांवर माहिती मागितलेली होती. परंतू सदर संस्था कोणतेही शासकीय अनुदान घेत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी दि. १६/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना कळविले व म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा त्यांच्या निर्णयात सदर संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही असे कळविले आहे. परंतू संस्थेच्या प्रवेशासंबंधी माहिती देणे संस्थेला बंधनकारक आहे असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०२/०९/२०१० च्या पत्रान्वये सदर संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान मिळत नसल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही असे कळविले आहे.

६. आयोगाकडे झालेल्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण यांचे प्रतिनिधी उपशिक्षण अधिकारी यांनी सांगितले की, महाराष्ट्र शासन उच्च तंत्रशिक्षण विभाग यांच्या दि. ११/०५/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे कै. वा. भुरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोहळी, ता. कळमेश्वर जि. नागपूर या संस्थेला कायम विना अनुदान तत्वावर नवीन आद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची परवानगी मिळाली आहे. परंतू सदर संस्थेला कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही. तसेच त्या शासन निर्णयाची प्रत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर सादर केली.

७. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, कै. वा. भुरे औद्योगिक प्रशिक्षण संस्था कोहळी, ता. कळमेश्वर जि. नागपूर या संस्थेला कायम विनाअनुदान तत्वावर नवीन औद्योगिक प्रशिक्षण केंद्र सुरु करण्याची परवानगी दि. ११/०५/२०१० च्या शासन निर्णयाप्रमाणे दिलेली आहे त्यामुळे सदर संस्थेस कोणत्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही असेही अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले म्हणून मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी ज्या शैक्षणिक संस्थेस शासकीय अनुदान मिळत नाही त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही असा निर्णय दिल्यामुळे सदरच्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३६२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री देवेंद्र विजयसिंग गहेरवार<br>किल्ला वार्ड, जुनी बस्ती तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद कार्यालय तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा बांधकाम लिपीक<br>नगर परिषद कार्यालय तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दिनांक २४/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि.१४/१०/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. जनमाहिती अधिकारी हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर होते. परंतू त्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख दि. १२/११/२०१० देण्यात आली. दि.१२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे लिपीक श्री सींगणगुडे हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. ०६/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा बांधकाम लिपीक नगर परिषद तिरोडा यांचेकडे त्यांच्या गट क्र. २०२/२ अ ह्या शेतजमीनीची आरक्षीत/ अनारक्षीत बाबत माहिती मागितलेली दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. ०५/०६/२०१० च्या पत्रान्वये रु ५६/- चा भरणा करण्याचे कळविलेले दिसून येते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या दि. ०५/०६/२०१० च्या अर्जावर त्यांनी सही केलेली नाही. परंतू दि. १६/०६/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी प्रश्न उत्तराच्या स्वरुपात खुलासा सादर केलेला दिसून येतो. तरीसुध्दा अपीलकर्ता यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद कार्यालय तिरोडा जि. गोंदिया यांचेकडे दि.१५/०६/२०१० च्या अर्जान्वये प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२१/०७/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली. त्यात त्यांनी मुद्या क्र. ४, ५, ७, ९ ची माहिती नगर रचनाकार गोंदिया यांचे विभागाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्त्याला ही माहिती त्यांच्या कार्यालयाद्वारे पुरवठा करण्यात आली नाही. म्हणून मुद्या क्र. ४,५, ७, ९ ची माहिती अपीलकर्ता यांनी नगर रचना गोंदिया यांचे कार्यालयातून प्राप्त करावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. तथापी अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांना प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही माहिती बरोबर मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहिती अधिकारातील अर्जास अनुसरुन त्यांना दि. १६/०६/२०१० च्या पत्रान्वये एकूण १ ते १० मुद्यांबाबतची माहिती देण्यात आली. त्यापैकी अपीलकर्ता यांना १० मुद्यांपैकी मुद्या क्र. १, २, ३, ६, ८, १० ची माहिती देण्यात आली. सदर मुद्ये नगर परिषदेशी संबंधीत असल्यामुळे या मुद्यांची माहिती देण्यात आली. परंतू मुद्या क्र. ४, ५, ७, ९ या मुद्यांची माहिती देण्यात आली नाही कारण हे मुद्ये नगर रचना विभागाशी संबंधीत आहेत व तसे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. नगर परिषदेशी संबंधीत असलेल्या मुद्यांची माहिती अपीलकर्ता यांना दि.१६/०६/२०१० च्या पत्रान्वये देण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा सुनावणीत सांगितले.

मात्र मुद्या क्र. ४, ५, ७, ९ ची माहिती नगर रचनाकार गोंदिया यांचे विभागाशी संबंधीत असल्याचे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती पुरविण्यात आलेली आहे असे दिसून येते. याबाबत अपीलकर्ता यांनी नगर पालिकेशी संबंधीत असलेल्या मुद्यांची माहिती त्यांना प्राप्त झालेली आहे असे सुनावणीत सांगितले. अपीलकर्ता यांना आणखी ज्या मुद्यांची माहिती पाहिजे आहे ती नगर रचना विभागाशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी नगर रचना विभाग गोंदिया यांचेशी संपर्क करुन मुद्या क्र. ४, ५, ७, ९ ची माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३७२/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गोविंदा भिकाजी नाकतोडे<br>मु. नवेगांव मक्ता<br>पो. ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती ब्रम्हपुरी<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक<br>ग्राम पंचायत कोथुळणा<br>ता. ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/११/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून नोटीस काढून दिनांक १५/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि.१५/१०/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. जनमाहिती अधिकारी हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी हजर होते. परंतू त्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख दि. १५/११/२०१० देण्यात आली. दि.१५/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. ०१/१२/२००९ च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा सरपंच/सचिव ग्राम पंचायत यांचेकडे गैरअर्जदार मुरलीधर ठाकरे यांनी घर क्र. १०० पाडल्याच्या संदर्भात दिलेल्या अर्जाची केलेल्या कारवाईबाबतची कागदपत्रे तसेच गैरअर्जदाराचे श्रीहरी भिका नाकतोडे यांचे संडासबाथरुम बसबत कागदपत्रे पुरविण्यासाठी सन २००८-०९ या कालावधीतील माहिती मागितलेली दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. २४/१२/२००९ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत कोथुळणा यांनी माहिती ची फी रु. ४०/- चा भरणा करावा अन्यथा भरणा न केल्यास आपणास माहिती पुरविली जाणार नाही असे कळविलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी ४०/- रुपये भरले व पैसे भरल्याची दि.२८/१२/२००९ ची पावती जोडलेली असून त्यावर ग्रामपंचायत सरपंच/सचिवांची सही दिसून येते. त्यानंतर दि.०१/०१/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना सचिव ग्रामपंचायत कोथुळणा यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असून त्यात फक्त ३ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू दि. ०७/०८/२००८ चे प्रकल्प संचालक जि. ग्रा. वि यंत्रणा यांचे पत्रावर केलेल्या कारवाई बाबत ग्राम पंचायतकडे लेखी माहिती दफ्तरी उपलब्ध नसल्यामुळे आपणास लेखी माहिती देऊ शकत नाही असेही  कळविलेले आहे.

४.	सदर माहिती विहित मुदतीत प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता  यांनी  प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी ब्रम्हपुरी  यांचेकडे दि. ०४/०१/२०१० रोजी  प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०९/०२/२०१० रोजी देण्यात आला असून त्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी, जनमाहिती अधिकाऱ्याने अर्जदाराच्या मागणीनुसार त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अर्जदारास पुरविलेली आहे तसेच सदरचे प्रकरण वैयक्तिक व जागेच्या स्वरुपातील असूनही अपीलकर्त्यास माहिती पुरविलेली आहे. व उपलब्ध नसलेली माहिती देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही असे नमूद करुन  प्रथम अपील खारीज केले आहे. परंतू त्यानंतरही अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितिय अपील दाखल केले आहे.

५. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक ग्राम पंचायत कोथुळणा यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना दि. २४/१२/२००९ ला माहितीचे शुल्क ४०/- चा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घेण्याचे कळविले होते. त्यानुसार अपीलकर्त्याने ४०/-रुपये भरले व त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास दिली. परंतू जी माहिती उपलब्ध नाही ती माहिती दिली नाही. अपीलकर्ता यांनी माहिती मिळाली नाही असे सुनावणीत सांगितल्यावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी पंचायत समिती ब्रम्हपुरी यांनी सांगितले की, अपीलार्थीस विचारणा केली असता प्रारंभी अपीलकर्त्याने माहिती मिळाल्याचे कबूल केले होते, मात्र नंतर संडासबाथरुमच्या बांधकामाची कागदपत्रे पंचायत समिती व ग्राम पंचायत कोथुळणा यांनी दिली नाही असे सांगितले. नेमकी कोणती कागदपत्रे अपीलकर्त्यास पाहिजे आहेत असा प्रश्न केला असता अपीलकर्त्याने उत्तर दिले नाही. तसेच केवळ संडास बाथरुमचा बांधकाम नकाशा इ. ग्राम पंचायतीत राहत नाही. तसेच प्रत्येक लाभार्थी आपल्या सोयीनुसार बांधकाम करतो. म्हणून अपीलीय अधिकारी यांनी त्यांचे दिनांक ०९/०२/२०१० रोजी निर्णय देवून असा निष्कर्ष काढला की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती पैकी सचिव ग्रामपंचायत यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना पुरविलेली आहे.

६. अपीलकर्ता व उत्तरवादी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यांनी माहिती मिळाल्याची पोच सुध्दा जोडलेली आहे. व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे समक्ष अपीलकर्ता यांनी माहिती मिळाल्याचे सुध्दा सांगितले आहे. यावरुन अपीलकर्त्यास माहिती मिळाल्याचे निदर्शनास येते त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३६९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री योगेश शेखर प्रधान<br>प्लॉट नं. ३५, रामकृष्ण नगर, दत्तवाडी, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत)<br>पंचायत समिती नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी<br>ग्राम पंचायत वाडी<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १५/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ३०/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. परंतू त्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून त्यांना सुनावणीची पुढील तारीख १५/११/२०१० देण्यात आली. दि.१५/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत वाडी श्री जी. पी गायकवाड हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती नागपूर श्री शहारे हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये दि. ०६/०२/२०१० च्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत वाडी ता.जि. नागपूर यांचेकडे रामकृष्णनगर न्यु मंगलधाम सोसायटी दत्तवाडी (वाडी ग्रामपंचायत) येथे सन २००० ते २०१० पर्यंत प्रत्येकवर्षी किती निधी कार्यांसाठी लावण्यात आला व कोणकोणत्या निधीचा वापर कार्यासाठी करण्यात आला, तसेच सन २००० ते २०१० पर्यंत रस्त्याच्या बांधकामासाठी किती निधी लावण्यात आला, रस्ता कच्चा किंवा डांबरीकरण होते यांचे विवरण, रस्ता कच्चा असल्यास कच्च्या रस्त्याचे कारण प्रत्येक वर्षानुरुप द्यावे, तसेच सार्वजनिक मंदिर परिसरातील मैदानासाठी कम्पाऊंडवाल, रस्त्यावरील प्रकाश दिवे किती लावले, कचरापेटी किती, बोरवेल किती अशाप्रकारची एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. १८/०२/२०१० च्या पत्रान्वये माहिती अधिकाराचा अर्ज विहीत नमुन्यामध्ये सादर करावा व आपणास हवी असलेली माहिती मुद्येसुद मागणी करावी असे नमूद केलेले दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी पुन्हा दि.०९/०३/२०१० ला जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी वाडी ग्राम पंचायत यांना अर्ज देवून माहिती मागितलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आपण मागितलेली माहिती उपलब्ध आहे, फी चा भरणा करुन माहिती घेवून जावे असे दि.१०/०३/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले दिसून येते. त्यानुसार अपीलकर्ता यांनी रुपये १०/- च्या पोस्टल आर्डर द्वारे फी चा भरणा केला आहे व त्याची पोच सुध्दा जोडलेली आहे. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्राम पंचायत, वाडी यांनी दि.१८/०३/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ग्राम पंचायत कार्यालयात उपलब्ध असून व्यक्तीशः घेवून जाण्याचे अपीलकर्त्यास कळविलेले आहे. त्यानुसार दि. १८/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांनी ग्रामपंचायत कार्यालय वाडी यांचे कार्यालयात जावून माहिती प्राप्त करुन घेतली परंतू सदर माहिती चुकीची व अपूर्ण दिली म्हणून अपीलकर्ता यांनी दि. १५/०४/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) पंचायत समिती नागपूर यांनी दि.२१/०५/२०१० रोजी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून त्यात अपीलार्थीने मागितलेली माहिती परिपुर्ण नसल्याने दिलेल्या अपूर्ण माहितीची माहिती जनमाहिती अधिकारी यांना देण्यात आली व अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.३१/०५/२०१० पर्यंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असे निर्देश दिले. परंतू अपीलकर्ता यांनी दि.२१/०६/२०१० ला पुन्हा अर्ज केला. दि. ३०/०६/२०१० अन्वये अपीलकर्ता यांना परिपूर्ण माहिती दि.०३/०७/२०१० पर्यंत जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्राम पंचायत वाडी यांना प्राप्त करुन देण्याचे आदेश प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपीलकर्ता यांना पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. अपीलकर्ता यांना आयोगापुढे सांगितले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती अपूर्ण असून त्यातील ३ मुद्यांची माहिती त्यांना मिळालेली नाही.

जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी ग्राम पंचायत वाडी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. ०६/०२/२०१० चा माहिती अधिकाराखालचा अर्ज प्राप्त झाला परंतू सदर अर्जात माहिती मोघम स्वरुपाची होती म्हणून अपीलकर्ता यांना दि. १८/०२/२०१० रोजी कळविण्यात आले. अपीलकर्ता यांनी पून्हा दि. ०९/०३/२०१० ला माहिती बाबत अर्ज केला. आणि त्याला अनुसरुन दि. १०/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना फी भरुन माहिती घेवून जाणेबाबत कळविण्यात आले. तथापी अपीलकर्ता यांनी फी चा भरणा केला नाही. मात्र अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष दि. १९/०३/२०१० रोजी फी न भरता देखील माहिती दिली. आणि त्याची पोच त्यांनी सुनावणीचेवेळी सादर केली. सदरची माहिती मिळाल्याबाबत अपीलकर्ता यांनी कबूली दिली मात्र ३ मुद्यांची माहिती त्यांना मिळालेली नाही असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रामकृष्ण नगर न्यू मंगलधाम सोसायटी वाडी, या ठिकाणी सन २००६ - ०७ भुजल सर्वेक्षण यंत्रणा जिल्हा परिषद नागपूर तर्फे पाणी टंचाई कार्यक्रमा अंतर्गत हातपंप बसविलेला आहे. त्या बाबतची कागदपत्रे त्यांना पाहिजे आहेत. यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, हातपंप बसविण्याबाबत ग्राम पंचायत ठराव झाला व त्या ठरावाची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात येईल. तसेच सन २००८-०९ मधील ले आऊट प्रमाणे सार्वजनिक मैदानाजवळ श्री धोटे यांचे घरामागील नालीचे बांधकामासाठी

खर्च रु.७४०४६/- इतके झाले आहे त्याच्या इस्टिमेटची प्रत त्यांनी मागितली आहे ती प्रत देखील देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी कबूल केले आहे. त्याचप्रमाणे वार्ड क्र. २, ३ खडी रस्ता बांधकामात झालेला खर्च इ. चे इस्टिमेटची प्रत आणि त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्ता यांनी मागितली आहे ते देखील उपलब्ध करुन देणे बाबत जनमाहिती अधिकाऱ्याने कबूल केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांनी वर नमूद केल्याप्रमाणे हातपंप बसविण्यासाठी झालेला खर्च रक्कम रु. ७४०४६/- च्या इस्टिमेटची प्रत, ग्राम पंचायत ठरावाची सत्य प्रत, इस्टिमेटची प्रत आणि त्याबाबत झालेल्या खर्चाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल आणि वार्ड क्र. २ व ३ मधे झालेला खडीरस्ता बांधकाम खर्च रक्कम रु.४,९१,४९९/- ची इस्टिमेटची प्रत, रजिस्टर पोस्टाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३७५/नाग/२०१०</u>**

१. श्री शेख सलीम शेख अकबर - **अपीलकर्ता**
ईस्माईलपुरा, कामठी
ता.कामठी जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) - **उत्तरवादी**
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक - **उत्तरवादी**
सेठ रामनाथ लोईया हायस्कूल, लोईया मार्ग, कामठी
ता. कामठी जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक १५/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ३०/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि.१५/१०/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याधिकारी यांचे तर्फे श्री डुंबरे हे हजर होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्रीमती शालीनी भंडारे हे हजर होते. परंतू त्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख १५/११/२०१० देण्यात आली. दि.१५/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य/मुख्याध्यापक यांचे तर्फे श्री डुंबरे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी हे गैर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १८/०५/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य /मुख्याध्यापक, सेठ रामनाथ लोईया हायस्कुल, लोईया मार्ग कामठी जि. नागपूर यांचेकडेशाळेस प्रथम मंजूरी बाबतची माहिती, तसेच नगर परिषद कामठी क्षेत्रामध्ये शाळेची नगर परिषदेद्वारे मंजूरी आणि शिक्षण उपसंचालकाची मंजूरीची सत्यप्रत, सन २००० ते २०१० पर्यंतची शाळेची ऑडिट रिपोर्ट आणि फायनानशियल रिपोर्टची माहिती, व विद्यार्थ्यांच्या प्रवेशासंबंधीची माहिती तसेच शाळेत घेतलेल्या परिक्षांची प्रश्न पत्रिका व उत्तर पत्रिकेच्या सत्यप्रती व मॅट्रिकच्या परिक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची पटसंख्या, वर्ष, उत्तिर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि गुण इ. एकूण ७ मुद्यांवर सन २००० ते २०१० पर्यंतची माहिती मागितलेली दिसून येते.

३. सदर अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सेठ रामनाथ लोईया हायस्कुल, लोईया मार्ग कामठी जि. नागपूर यांनी दि. १५/०६/२०१० च्या पत्रान्वये एकूण ७ मुद्यांवर माहिती दिली. परंतू अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्य) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि. ३०/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी दि. ३१/०८/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सेठ रामनाथ लोईया हायस्कुल कामठी यांना अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना ७ दिवसांचे आत उपलब्ध करुन द्यावी, अन्यथा दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल असे आदेश दिले. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांनी दि. १८/०५/२०१० ला अर्ज करुन जनमाहिती अधिकारी यांना शाळेबद्यल एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली होती व त्यासाठी त्यांना रु.९३०/- चे शुल्क भरावे लागले होते. शुल्काचा भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दि. १५/०६/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती पाठविलेली आहे. सदर माहिती अपीलकर्ता यांना मिळाली मात्र जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती आहे असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतर सुध्दा पूर्ण माहिती मिळाली नाही असे त्यांनी नमूद केले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी सूनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचेकडून आवश्यक ती फी भरुन घेवून दि. १५/०६/२०१० च्या पत्रान्वये रजिस्टर पोस्टाने माहिती अपीलकर्ता यांना पाठविलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना मिळालेली आहे असे अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी कबूल केले. मात्र अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून अद्यापही जी माहिती मिळालेली नाही ती खालीलप्रमाणे आहे.

१) सेठ रामनाथ लोईया हायस्कूल आणि ज्यनिअर कॉलेज यांना नगर परिषदेकडून मिळालेले नाहरकत प्रमाणपत्राची प्रत.

२) सेठ रामनाथ लोईया हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज यांना शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांचेकडून मिळालेल्या मान्यता प्रमाण पत्राची प्रत.

३) अपीलकर्ता यांना जी माहिती दिलेली आहे ती प्रमाणित करुन दिलेली नाही. तसेच अपीलकर्ता यांनी ज्या माहितीची मागणी केली नव्हती त्याबाबतही जनमाहिती अधिकारी यांनी फी आकारुन अर्जदाराकडून ज्यादा फी घेतली आहे ती परत करण्याची मागणी अपीलकर्ता यांनी केली आहे.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. १५/०६/२०१० च्या पत्रान्वये जी माहिती पाठविलेली आहे ती माहिती माहितीच्या अधिकाराखाली देण्यात आली आहे असे प्रमाणित करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच सेठ रामनाथ हायस्कुल आणि ज्युनिअर कॉलेज यांना नगर परिषदेकडून ना हरकत प्रमाणपत्र मिळण्याची जी वस्तुस्थिती असेल त्या बद्यल देखील वस्तुस्थितीदर्शक माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे योग्य होईल. अपीलकर्ता यांनी त्यांचे दि. १८/०५/२०१० च्या माहिती अधिकाराच्या अर्जात ज्या वर्षाची माहिती मागितली आहे त्या व्यतिरिक्त इतर वर्षाचीही माहिती दिलेली आहे व त्याची सुध्दा फी आकारलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांनी ज्या कागदपत्रांची मागणी केली नाही त्यासाठी त्यांना फी परत करणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी दि. १५/०६/२०१० च्या पत्रान्वये जी माहिती पाठविलेली आहे ती माहिती अधिकाराखालील अर्जाप्रमाणे पाठविण्यात येत आहे असे प्रमाणित करुन द्यावे.

२. सेठ रामनाथ लोईया हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज कामठी जिल्हा नागपूर यांचे बाबत नगर परिषदेचे नाहरकत प्रमाणपत्राची प्रत देणेबाबतची वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना कळवावी.

३. सेठ रामनाथ लोईया हायस्कुल व ज्युनिअर कॉलेज कामठी जिल्हा नागपूर यांना शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नागपूर यांनी शाळेच्या मान्यता मिळाल्याच्या उपलब्ध असलेल्या प्रती द्याव्या.

४. अपीलकर्ता यांनी त्यांचे दि. १८/०५/२०१० च्या अर्जात ज्या वर्षाची माहिती मागितलेली आहे त्या वर्षाच्या माहितीचीच फी घेण्यात यावी आणि ज्या वर्षाची माहिती मागितलेली नाही त्या माहितीसाठी घेतलेले अतिरिक्त शुल्क अपीलकर्ता यांना परत करावे.

उपरोक्त कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे मुदतीत करावयाची आहे.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रत प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १३५८/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजा खान मेहबूब खान<br>सुमित अपार्टमेंट, शनिवारी, कॉटन मार्केट, १ ला माला<br>सुभाष रोड, नागपूर -१८ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक<br>महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई<br>कृपानिधी, ९ वालचंद हिराचंद मार्ग, बेल्लार्ड इस्टेट मुंबई-४००००१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी महाव्यवस्थापक<br>महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई<br>कृपानिधी, ९ वालचंद हिराचंद मार्ग, बेल्लार्ड इस्टेट मुंबई-४००००१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २३/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. परंतू त्या दिवशी सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख ३०/११/२०१० देण्यात आली. दि.३०/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी व्यवस्थापक श्री चरडे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मुंबई श्री कपाटे हे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. ०२/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा महाव्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई कृपानिधी, ९ वालचंद हिराचंद मार्ग, बेल्लार्ड इस्टेट मुंबई- ०१ यांचेकडे दगडी कोळसा लायसनिंग चे कंत्राट क्र. MSSIDC / COAL / HA / 2008-09 / APPOINTMENT OF HANDLING AGENT FOR/COAL कंत्राटदार मे. मोहित मिनरल्स प्रा. लि. पत्ता A-१७६, सुदर्शन पार्क, नई दिल्ली - ११००१५, या निविदा धारकाचे निविदा टेक्निकल बिड पार्ट १ चे आणि अटी शर्ती नुसार सोबत जोडलेल्या आवश्यक ते सर्व दस्तऐवजांची सत्यप्रत देण्याचे करावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३.	सदर अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ मर्यादित मुंबई यांनी दि. १५/०२/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना एकूण ४ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांचेकडे दि. २७/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.३०/०८/२०१० रोजी देण्यात आला असून निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांनी रु ९३८/- चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावे असे कळविलेले असून जनमाहिती अधिकारी श्री चरडे यांनी फी प्राप्त झाल्याबरोबर अपीलकर्ता यांना त्वरीत आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन द्यावी तसेच जनमाहिती अधिकारी श्री डी. एस. चरडे. महाव्यवस्थापक (कच्चामाल/कोळसा) यांनी अपीलकर्ताने मागितलेली माहिती वेळेत पुरविण्यासाठी सर्व कार्यवाही केलेली असल्यामुळे त्यांच्यावर शास्ती लावण्याचे कारण उद्‌भवत नाही असे आदेश प्रथम अपीलाच्या निर्णयात दिले आहेत. तथापी अपीलकर्ता यांनी फी न भरल्यामुळे माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दि. ०४/०६/२०१० ला त्यांच्याकडे प्राप्त झाला सदर माहिती अर्जात नमूद केलेल्या माहितीची संपूर्ण माहिती त्यांनी संकलीत केली असून त्यासाठी येणाऱ्या खर्चाची रक्कम रु. ९३८/- ची फी भरणेबाबत अपीलकर्ता यांना दि.२४/०६/२०१० रोजी यूपीसीने कळविलेले होते व त्याची प्रत सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे दाखविली. त्यामुळे फी भरण्याचे पत्र अपीलकर्त्यास युपीसीने पाठविल्याचे दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांनी माहितीची फी भरलेली नाही तसेच याबाबत लेखी सुध्दा कळविले नाही त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देता आली नाही. अपीलकर्ता फी भरण्यास तयार असल्यास जनमाहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत असे त्यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले. यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना अद्यापर्यंत फी भरणेबाबतचे पत्र मिळालेले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांचेकडे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दि. २७/०७/२०१० रोजी दाखल केले त्याची सुनावणी दि. ३०/०८/२०१० रोजी घेवून निर्णय दिला की, अपीलकर्ता यांनी नियमानुसार जनमाहिती अधिकारी यांनी मागणी केलेली फी रु. ९३८/- त्वरीत भरणा करावी व फी भरल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील अपीलकर्ता यांनी माहितीची फी रु.९३८/- चा भरणा केला नसल्यामुळे त्यांना माहिती पुरविण्यात आली नाही असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज करुन माहिती मागितली होती त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहितीकरीता रु. ९३८/- फी भरणेबाबत कळविले होते त्यानुसार अपीलकर्ता यांनी फी चा भरणा केला नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर सुध्दा अपीलकर्ता यांनी फी रु.९३८/- भरलेली नाही. अपीलकर्ता यांना माहिती पाहिजे असल्यास रु.९३८/- फी चा भरणा करणे आवश्यक आहे तसेच रु. ९३८/- च्या फी चा भरणा करुन अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे रु.९३८/- ची फी भरावी. व जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती त्यांनी रु.९३८/- ची फी भरल्यानंतर व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४४२/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मेघराज पुंडलीकराव डोंगरे<br>रा. पिंपळा पुर्नवसन, आर्वी<br>ता. आर्वी जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद आर्वी<br>ता. आर्वी जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नगर परिषद आर्वी<br>ता. आर्वी जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/११/२०१०)**

**निर्णय**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०५/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि. २५/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद आर्वी यांना मौजा स्टेट बँक कॉलनी आर्वी येथील प्रतापचंद फेरुमल मोटवानी व ईश्वरीबाई मोटवानी यांचे नावावर असलेल्या मकानाच्या नकाशा मंजुरी बाबतची माहिती व जागेच्या क्षेत्रफळाची संपूर्ण व सविस्तर माहिती मागितलेली आहे. सदर माहिती व्यक्तीशाः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी नगर परिषद यांनी अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती दिली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दि. ०१/०७/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद यांचेकडे दाखल केले आहे . प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी दि. २७/०७/२०१० ला निर्णय दिला असून त्यात माहिती अधिकारी यांनी विचारणा केली असता (१) घनश्याम चांडकचे जागेची फेरफार पंजीच्या प्रती देण्यात आल्याचे कळविण्यात आले. (२) मुद्दा क्रमांक २ ची माहिती उपलब्ध नसल्याचे सांगितले. बांधकाम विभागाचे पत्र दि. २६/०७/२०१० अन्वये श्रीमती मोटवानी व श्री प्रतापचंद मोटवानी ह्यांना त्वरीत बांधकाम नकाशा सादर करणेबाबत पत्र देण्यात आले आहे. सात दिवसापर्यंत श्री मोटवानी यांनी कागदपत्रे सादर केल्यास किंवा न केल्यास तसे अर्जदारास वरील बांधकाम अधिकृत किंवा अनाधिकृत असल्याबाबत त्वरीत कळविण्यात यावे असा निकाल देवून प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांनी मौजा स्टेटबँक कॉलनी आर्वी येथील प्रतापचंद मोटवानी व ईश्वरीबाई मोटवानी यांचे नावावर असलेल्या मकानाचा नकाशा मंजूरी बाबतची माहिती व जागेच्या क्षेत्रफळाची माहिती मागितली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही व प्रथम अपील निकाली काढल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखाली केलेला दि. ०७/०६/२०१० चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला असून त्यात मागितलेली माहिती ही नगर पालिकेतील बांधकाम विभागाशी संबंधीत असल्यामुळे बांधकाम विभागाकडून ती माहिती घेण्यात आली. नगर पालिका बांधकाम विभागाने माहिती अधिकारी यांचेकडे दि. २८/०६/२०१० च्या पत्रान्वये माहिती दिली. आणि त्या माहितीच्या आधारे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तास दि. ०१/०७/२०१० च्या पत्राने माहिती पुरविली. सदरच्या माहितीमध्ये असे नमूद केले की, मौजा स्टेटबँक कॉलनी आर्वी येथील श्री प्रतापचंद फेरुमल मोटवाणी यांचे नावावर असलेले मकान अंदाजे २० ते २५ वर्ष जूने असून त्यावेळेस नगर पालिकेचे कनिष्ठ अभियंता श्री छांगाणी हे कार्यरत होते मागील ४-५ वर्षापासून कनिष्ठ अभियंता श्री छांगाणी हे निलंबीत असल्यामुळे सदर्हु

बांधकाम नकाशाची फाईल ही कार्यालयात शोधूनही मिळाली नाही त्यामुळे नगर पालिका बांधकाम विभागाजवळ सदर्हु रेकॉर्ड उपलब्ध नसल्यामुळे माहिती देता येणे शक्य नाही असे अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०१/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. २७/०७/२०१० ला दिला असून त्यात प्रतापचंद मोटवानी व ईश्वरीबाई मोटवानी यांचे घराचे बांधकाम नकाशा ७ दिवसात सादर करण्यास माहिती अधिकारी यांनी कळविले असून श्री मोटवानी यांनी कागदपत्रे सादर केल्यास किंवा न केल्यास अर्जदारास वरील बांधकाम अधिकृत, अनधिकृत असल्याबाबत कळविण्यात यावे असे प्रथम अपीलात नमूद केले. त्यानुसार श्री मोटवानी यांचे नावावर असलेल्या मकानाचे बांधकाम अनधिकृत आहे असे दिसून आले म्हणून अपीलकर्तास दि. १८/११/२०१० च्या पत्रान्वये सहा. माहिती अधिकारी नगर पालिका आर्वी जि. वर्धा यांनी कळविलेले दिसून येते. सदरचे बांधकाम अनधिकृत असल्यामुळे नगर पालिकेच्या नियमाप्रमाणे त्या संदर्भात योग्य ती कार्यवाही नियमाप्रमाणे करण्यात येईल असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीचा तपशील हा अनधिकृत बांधकामबाबतचा आहे ही माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३६०/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री  भोजराज गुलाबराव वानखेडे<br>प्लॉट क्र. १५, आवळे नगर, नारी रोड, टेका नाका, नागपूर<br>ता. जि. नागपूर - २६ | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु द्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता<br>ग्रामिण  परिमंडळ  कार्यालय,   महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या.<br>विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर - १३ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>ग्रामिण  परिमंडळ  कार्यालय,   महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या.<br>विद्युत भवन, काटोल रोड, नागपूर - १३ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक  १२/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१.	अपीलकर्ता यांनी दि. २३/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २४/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने  (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि. १४/१०/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. ए. एम. काझी हे हजर आहेत. परंतु सदर तारखेस सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि. १२/११/२०१० ही देण्यात आली असून दि. १२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे वतीने ॲड. काझी  हे  हजर आहेत.  प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता ग्रमिण परिमंडळ  कार्यालय,  महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. हे उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०७/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी मुख्य अभियंता, ग्रमिण परिमंडळ कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. नागपूर यांचेकडे जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री अरुण मोतीराम वाऱ्होकर कार्यकारी अभियंता (तत्कालीन) चंद्रपूर मुख्य अभियंता, म. रा. वि. वि. कं. (वाणिज्य) मुंबई ह्यांनी सं. व. सु. विभाग म.रा.वि.वि.कं. चंद्रपूरला असतांना केलेल्या भ्रष्टाचाराबाबतची कार्यवाहीची माहिती देण्याबाबत उपआयुक्त चिटणीस तथा माहिती अधिकारी महसुल शाखा नागपूर पत्र दि.१७/०८/०५ आपल्या कार्यालयास पाठविले याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता-२ MSEDCL नागपूर यांनी दि.२६/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना २/- रु. प्रमाणे प्रती पेजला रु.४/- व पोस्टेज रु.१०/- असे एकूण रु. १४/- चा भरणा करावा त्यानंतर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविलेले आहे. अपीलकर्ता यांनी रु. ४/- चा भरणा केला असून त्याची पोच सोबत जोडलेली आहे.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, श्री अरुण वाऱ्होकर तत्कालीन कार्यकारी अभियंता चंद्रपूर हे तेथे असतांना त्यांच्या भ्रष्टाचाराबाबत त्यांच्यावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील माहिती मिळण्यासाठी त्यांनी माहिती अधिकारी तथा उपायुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे अर्ज दिला होता. सदर अर्ज महसूल शाखेने दि.१७/०८/२००५, १६/०२/२००६ व दि. २३/०६/२०१० अन्वये कार्यवाहीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीकडे पाठविला होता. त्यावर काय कार्यवाही केली ही माहिती त्यांना पाहिजे होती. तथापी ती माहिती त्यांना मिळालेली नाही.

५. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी ग्रामिण नागपूर आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता ग्रामिण परिमंडळ कार्यालय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी हे उपस्थित असून त्यांच्या वतीने ॲड. काझी यांनी आयोगापुढे बाजू मांडली. आयोगापुढे युक्तिवाद करतांना त्यांनी सांगितले की, माहिती अधिकाराखालील श्री वानखेडे यांचा अर्ज

दि. ०९/०७/२०१० ला जनमाहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी श्री वाऱ्होकर कार्यकारी अभियंता हे चंद्रपूरला असतांना त्यांनी केलेल्या भ्रष्टाचारासंबंधीची कागदपत्रे मागितली होती. सदर माहिती प्रशासन विभाग कार्यकारी मंडळ यांचेकडून दि.२६/०८/२०१० रोजी प्राप्त झाली असून सदर प्राप्त झालेली माहिती अर्जदारास दि.२६/०८/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध झाल्याचे जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (प्रशासन) (नाप) नागपूर यांनी कळविलेले दिसून येते. त्यानुसार अपीलकर्त्याने सदर माहिती दि. ०३/०९/२०१० रोजी व्यक्तीशः प्राप्त केलेली आहे. अर्जदाराने यापूर्वी देखील हीच माहिती दि. १४/०२/२००६ रोजी मुख्य कार्यालय मुंबई यांचेकडे मागविली होती. सदर माहिती अर्जदारास दि. १५/०६/२०१० च्या पत्रान्वये देण्यात आलेली आहे. सुनावणीत जनमाहिती अधिकारी यांनी पुढे सांगितले की, अर्जदार एकच माहिती मुख्य अभियंता कार्यालय ग्रामिण परिमंडळ कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. यांचेकडे वारंवार मागत आहे. यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त कार्यालय महसूल शाखेकडे जो अर्ज त्यांनी केला होता त्या अर्जावर महसूल शाखेने जो चौकशी अहवाल मागविला होता त्याबाबतची माहिती त्यांना पाहिजे आहे. परंतू याबाबत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडील कोणतेही पत्र त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाले नाही. कारण नागपूर शहरात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे आणखी कार्यालय कार्यरत आहेत. त्यामुळे विभागीय कार्यालयाचे पत्र नेमके कोणत्या कार्यालयाकडे गेले आहे याचा आता खुलासा करता येणे शक्य नाही.

५. म्हणून अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांच्या संमतीने असे ठरले की, विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडून पत्र व्यवहार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ज्या कार्यालयाकडे प्राप्त झाला असेल त्याचा शोध विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी घ्यावा आणि त्या पत्र व्यवहाराबाबतची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. या बाबीस अपीलकर्त्याने संमती दिली त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी विभागीय आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या ज्या कार्यालयाकडे पत्र व्यवहार झालेला असेल त्या कार्यालयाचा शोध घ्यावा आणि त्या पत्रव्यवहाराबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३८४/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विजय पांडुरंगजी वानखेडे<br>मु. पो. मोहपा<br>ता. कळमेश्वर जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी<br>नगर परिषद मोहपा<br>ता. कळमेश्वर जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा लिपीक<br>नगर परिषद कार्यालय मोहपा<br>ता. कळमेश्वर जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १२/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०६/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ३०/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि. १६/१०/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत व उत्तरवादी हजर होते. परंतु सदर तारखेस सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि.१२/११/२०१० ही देण्यात आली असून दि. १२/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी दि. ११/०६/२०१० रोजी  जनमाहिती अधिकारी तथा लिपीक, बांधकाम विभाग सु.ज.श.रो. योजना न. प. मोहपा सु. ज. श. रोजगार योजनेचे दि. १७/१२/२००४ चे शासनाचे पाठविलेल्या परिपत्रकाची सत्यप्रतीची मागणी केली आहे. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी रु. ३/- फी भरुन माहिती घेवून जावी असे अपीलकर्ता यांना दि. ०९/०७/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी ते पत्र घेण्यास नकार दिला अशी  दि. ०९/०७/२०१० च्या पत्रात नोंद केलेली दिसते. पुन्हा जनमाहिती अधिकारी यांनी दि. ११/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहितीसाठी रु. ३/- चा भरणा करावा व माहिती घेवून जावी असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी शुल्क भरले नाही म्हणून त्यांना माहिती देण्यात आली नाही त्यामुळे अपीलकर्ताने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. १२/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

४.	प्रथम अपीलीय अधिकारी यांनी  दि. ०६/०८/२०१० रोजी निर्णय दिला. त्या निर्णयात त्यांनी  अपीलकर्ता यांनी माहितीकरीता रु. ३/- चा भरणा केला नाही त्यामुळे जनमाहिती अधिकाऱ्यामार्फत माहिती देण्यात आली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे चुकीचे आहे. अपीलार्थीकडून विहीत शुल्क आकारुन ७ दिवसाचे आत आवश्यक असलेली माहिती अपीलकर्त्यास द्यावी. तसेच अपीलकर्ता यांना ९० दिवसात राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करता येईल असे कळविले आहे. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपीलकर्ता यांना अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५.	अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही व जनमाहिती अधिकारी यांना व्यक्तीशः माहिती घेणार असे कळविल्यानंतरही पोस्टाच्या द्वारे पत्र पाठविले म्हणून माहिती घेण्यास इंकार केला.  परंतू प्रथम अपीलाच्या नंतर दि. १६/०८/२०१० रोजी शुल्क भरले. तरीसुध्दा अपूर्ण माहिती मिळाली.

६. जनमाहिती अधिकारी यांनी युक्तिवाद करतांना आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांना मुदतीचे आत माहिती देण्याकरीता त्यांच्या अर्जानुसार माहिती तयार करण्यात आली व माहितीकरीता अपीलकर्ता यांना रु.३/- चा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी दि. १२/०७/२०१० च्या पत्रान्वये नगर पालिकेच्या शिपायामार्फत कळविले असता अपीलकर्त्याने माहिती घेण्यास नकार दिला. नगर पालिका कार्यालयाचा शिपायाने त्याठिकाणी उपस्थित असलेल्या श्री अशोक ढोले या साक्षदाराची सही घेतली. त्यानंतर दि. १३/०७/२०१० व दि.१४/०७/२०१० च्या पत्रान्वये पुन्हा अपीलकर्त्यास माहितीच्या शुल्का करिता कळविण्यात आले. परंतू अपीलकर्ता यांनी माहितीचे शुल्क रुपये ३/- भरले नाही म्हणून त्यांना माहिती देण्यात आली नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले.

७. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयात सुध्दा अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घेण्यास दि. ०६/०८/२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार दि. १६/०८/२०१० रोजी अपीलकर्ताने माहितीचे शुल्क रु. ३/- भरले व त्याच दिवशी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तथापी याबाबत अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी शुल्क भरल्यानंतरही त्यांना दि. १७/१२/२००४ च्या सुवर्ण जयंती रोजगार योजनेच्या शासन निर्णयाच्या छायांकित प्रतीच्या पेज क्र. ३६ ते ३९ पैकी पेज क्र. ३८ मिळाले नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी पेज क्र. ३८ हे नजरचुकीने झेरॉक्स करतांना राहीले असे सांगितले. पेज क्र. ३८ ची माहिती त्वरीत अपीलकर्ता यांना विनामुल्य देण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी मान्य केले. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी रोजगार योजनेबाबतचे दि.१७/१२/२००४ च्या शासन निर्णयाचे पेज क्र. ३८ ची प्रत उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १३७६/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संदीप सुधाकर मुंजे<br>C/o, श्री दि. वि. देशपांडे, प्लॉट क्र. ७२, पुष्पक सहनिवास<br>फ्लॉट क्र. २०४, पांडे ले-आऊट, खामला, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०२५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त<br>वाहतुक विभाग, नागपूर शहर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त<br>वाहतुक विभाग पश्चिम, नागपूर शहर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०९/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. ३०/०९/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५/१०/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. दि. १५/१०/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते व उत्तरवादी हजर होते. परंतु सदर तारखेस सुनावणी होवू शकली नाही म्हणून अपीलकर्ता व उत्तरवादी यांना सुनावणीची पुढील तारीख दि.१६/११/२०१० ही देण्यात आली असून दि. १६/११/२०१० च्या सुनावणीस अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री ए. एम. धोगे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०४/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त वाहतुक पश्चिम विभाग नागपूर शहर यांचेकडे सहा. पो. आ. वाहतुक पश्चिम विभाग, नाग. शहर यांनी त्यांचे जा. क्र. सपोआ. /वावि/२५६/२००९ नुसार दि. १२/०९/२००९ रोजी पो. वा. वि. नाग शहर यांना सादर केलेल्या तथाकथित चौकशी अहवालाबाबत अर्जदाराने पो. उपायुक्त वा. वि. नाग. शहर यांचे आदेशानुसार सहा. पो. आ. वाहतूक पश्चिम विभाग नाग. शहर यांनी दि. ०३/०५/२००९ रोजीचे घटनेची तथाकथित चौकशी करुन पो. उपायुक्त वा. वि. नाग. शहर यांना सादर केलेला चौकशी अहवाल या विषयाची रीतसर लेखी तक्रार दि. ०१/१०/२००९ रोजी पोलीस आयुक्त, नागपूर यांचेकडे दाखल केली आहे त्याबाबत एकुण १२ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त वाहतूक विभाग, नागपूर शहर यांनी अपीलकर्ता यांना दि. ०६/०५/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. व अपीलकर्ता यांना दि.०७/०५/२०१० ला ७+३ पानांची माहिती प्राप्त झाली असून त्यावर अपीलकर्ता यांची सही दिसून येते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना खोटी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. २२/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त, वाहतुक नागपूर शहर यांनी दि. २८/०६/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास एकूण १२ मुद्यांबाबत माहिती रेकॉर्डवर उपलब्ध नाही असे कळविले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे १२ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना ६ दिवस उशिरा माहिती मिळाली व मिळालेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी होती असे त्यांचे म्हणणे आहे. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. व प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसून फक्त मुद्यांस्वरुपात माहिती दिली आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही व त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी पुन्हा सांगितले की, त्यांच्या अर्जातील मुद्या क्र. ७ नुसार

सहा. पोलीस आयुक्त पश्चिम विभाग यांनी जी चौकशी केलेली आहे त्या चौकशीच्या मुद्येसुद अहवालाची एक प्रत त्यांना देण्यात यावी म्हणून अपीलकर्ता यांना सहा. पोलीस आयुक्त पश्चिम विभाग यांनी केलेल्या मुद्येसुद अहवालाची एक प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे योग्य राहील.

६. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्ता यांना दि. ०६/०५/२०१० च्या पत्राने माहिती दिली आहे व ती त्यांना दि. ०७/०५/२०१० ला प्राप्त झालेली आहे व त्यावर अपीलकर्ता यांची स्वाक्षरी सुध्दा आहे, त्याची पोच जोडलेली आहे. अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अधिकाराखालील अर्जानुसार ३० दिवसात माहिती मिळणे आवश्यक होते मात्र त्यांना दि. ०७/०५/२०१० रोजीच माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. अपीलकर्ता यांना ६ दिवस माहिती उशिरा उपलब्ध करुन दिली याबाबतचे समर्थन करतांना जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे त्याची माहिती काढण्यास कार्यबाहुल्याने थोडा विलंब झाला आहे.

७. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी त्यांच्या लेखी निवेदनात असे दिले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेतली त्यावेळी असे दिसून आले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तास पुरविण्यात येण्यासारखी अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती देण्यात आलेली आहे. तसेच जी माहिती उपलब्ध नाही ती देण्यात आली नाही असे सुध्दा सांगितले. जनमाहिती यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्तास देण्यात आल्यामुळे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील खरीज करण्यात आले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

८. जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त पश्चिम विभाग नागपूर शहर यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे त्याची माहिती काढण्यास कार्यबाहुल्याने थोडा विलंब झाला आहे असे त्यांचे समर्थन योग्य वाटते. व मुद्या क्र. ७ बाबत जो चौकशीचा मुद्येसूद अहवाल दिलेला आहे त्याची प्रत अपीलकर्तास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी वर नमूद केल्याप्रमाणे मुद्येनिहाय केलेल्या चौकशी अहवालाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

## अपील क्र. १४३९/नाग/२०१०

१. श्री दिगंबर नथ्थु रामटेके - **अपीलकर्ता**
रा. कुंभारे नगर, पिंपरा रोड, श्री राहूल देशभ्रतार यांच्या घरासमोर, तुमसर
पो. ता. तुमसर जि. भंडारा -४४१ ९१२

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता - **उत्तरवादी**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर, छावणी, औरंगाबाद - ४३१ ००२

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक - **उत्तरवादी**
महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, औरंगाबाद
मिलींद कॉलेज समोर, छावणी, औरंगाबाद - ४३१ ००२

## (आदेश पारित दिनांक २५/११/२०१०)
## नि र्ण य

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २६/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ औरंगाबाद यांचेकडे मुख्य प्रशासकीय अधिकारी म.जी.प्रा.मं. मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण १००६/ आगाऊ वेतनवाढ / २३/ आ.३/ २४६ दि.२८/०८/२००६ नुसार अधिक्षक यांच्या सन १९९४-९५ ते सन १९९८-९९ या कालावधीतील

गोपनीय अहवालाची प्रत कळविलेली आहे तरी त्यानुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती, दि. १८/०३/२०१० रोजी झालेल्या परिमंडळ बैठकीची इतिवृत्ताची प्रत, दिनांक ०१/०१/२००६ ते ३१/०३/२०१० पर्यंत औरंगाबाद परिमंडळ कार्यालयात कार्यरत असलेल्या अधिकारी कर्मचारी यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती नोंदणीकृत टपालाने घेण्याचे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. १ व २ ची माहिती दि. १७/०५/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मात्र मुद्या क्र. ३ ची माहिती दिलेली नाही व अपूर्ण माहिती दिली म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू अपीलकर्ता हे प्रथम अपीलाच्या सुनावणीस हजर झाले नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ औरंगाबाद यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देवून अर्जदाराचे प्रथम अपील फेटाळले म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, त्यांनी दि. २६/०३/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांना आगाऊ वेतनवाढी संबंधात पूर्नविलोकनाबाबतची माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्र. १ व २ ची माहिती प्राप्त करुन दिली मात्र मुद्या क्र. ३ ची माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे नमूद करुन प्रथम अपील फेटाळले आहे. तथापी अपीलकर्ता यांना मुद्या क्र. ३ ची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर उपलब्ध करुन दिली त्यामुळे अपीलकर्ता यांना तीनही मुद्यांची माहिती मिळालेली आहे व त्यांचे समाधान झाले आता त्यांची कोणतीही तक्रार राहीली नाही असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४३३/नाग/२०१०**

१. कु. नेहा दिलीप देशमुख - **अपीलकर्ती**
रा. अंबाझरी गार्डन जवळ, प्लॉट क्र. १३, देवतळे ले - आऊट नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी (मुख्यालय व नियोजन) - **उत्तरवादी**
गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली
ता. जि. गडचिरोली

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक - **उत्तरवादी**
वनसंरक्षक कार्यालय, दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, मूल रोड, चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर

**(आदेश पारित दिनांक २४/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ती यांनी दि. ०५/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २२/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ती गैरहजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना सुनावणीस प्राधिकृत केलेले आहे.

२. अपीलकर्ती यांनी दि. २५/०४/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक वनसंरक्षक कार्यालय, दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, मूल रोड, चंद्रपूर यांचेकडे वनपाल संवर्गातील पदे भरतांना प्रस्तावातील सुधारीत मार्गदर्शक सुचनेची छायांकित प्रत, मुलाखत समिती व समितीतील सदस्यांची नावे, मौखीक परिक्षेतील उमेदवारांचे गुण अशाप्रकारची एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती प्रत्यक्ष व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक वनसंरक्षक कार्यालय गडचिरोली वनवृत्त गडचिरोली यांनी दि.२६/०५/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तीस ७० पानांची माहिती पुरविण्याकरीता प्रती पेज रु.२/- प्रमाणे रु.१४०/- ची रक्कम मनिआफर्डर अथवा डी. डी. च्या स्वरुपात त्यांचे कार्यालयात पाठवावी असे कळविलेले आहे. त्यानुसार अपीलकर्ती हिने दि. ०५/०६/२०१० रोजी रु १४०/- चा भरणा केलेला आहे व त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस माहिती पुरविलेली आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांचेमार्फत पुरविलेल्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय वन अधिकारी यांचेकडे दि. १४/०६/२०१० च्या अर्जान्वये प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. १३/०७/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला असून त्यात त्यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क्र. ४ व ६ ची माहिती १० दिवसाचे आत मोफत पूरविण्यात यावी असे आदेशीत केले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती ही गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी हे हजर असून त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, अपीलकर्ती यांचा अर्ज त्यांचेकडे दि. ०३/०५/२०१० ला प्राप्त झाला. त्यांच्या माहितीच्या अर्जानुसार त्यांनी वनपाल संवर्गातील पदे भरतांना च्या कार्यवाही संदर्भात ६ मुद्यांची माहिती मागितलेली आहे. त्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दि.०५/०६/२०१० च्या पत्रान्वये ६ मुद्यांची मुद्येनिहाय माहिती पुरविलेली आहे.

व दि. ०५/०६/२०१० चे पत्र त्यांनी आयोगासमोर सादर केले.

६. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयास अनुसरुन ४ व ६ मुद्यांची माहिती देखील अपीलकर्तीस यापूर्वीच पुरविलेली आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. पुन्हा त्याच मुद्यांबाबत काही माहिती अपीलकर्तीस पाहिजे असल्यास जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात हजर राहण्याचे अपीलकर्तीस कळविले होते परंतू अर्जदार ही कार्यालयात हजर राहीले नाही.

जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर त्यांनी सादर केलेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दि. ०५/०६/२०१० ला माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४०३/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रत्नशील फुले<br>प्लॉट नं. ४८, गुरुनानकपूरा, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०१७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्ध**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय मौदा<br>ता. मौदा जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २०/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे नायब तहसिलदार सौ विनीता निलेश लांजेवर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. २०/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचेकडे दि. २९/०१/१९८३ मध्ये सूर्यभान बिसन बागडे रा. खात यांचेशी संबंधीत मौजा कोपरा येथील सर्वे नं. ४८/२ आराजी ३.१८ हे. या शेताचा ताबा देण्याबाबत एक कार्यालयीन पत्र पाठविले होते त्याची प्रत

मिळण्याकरिता मागणी केलेली आहे. सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांनी दि. ११/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी दि. २५/०८/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक कार्यालय यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. ०२/०९/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांना अपीलकर्त्याच्या अर्जानुसार त्वरीत अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात यावी व त्याचा अहवाल या कार्यालयात सादर करावा असे सूचविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

५. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती अधिकाराखालील अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर केला होता परंतू त्या अर्जानुसार त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपीलाचा सुध्दा निर्णय त्यांना मिळाला नाही. म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

६. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील माहिती तलाठी प.ह.नं. कोपरा यांचेशी संबंधीत असल्यामुळे दि. १०/११/२०१० च्या पत्राने त्यांच्याकडून माहिती मागितली. आणि तलाठी कोपरा यांचेकडून माहिती प्राप्त झाल्यानंतर दि. ११/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास पुरविली. तसेच त्यांच्याकडे उपलब्ध झालेल्या पत्रावरुन असे दिसून येते की, नायब तहसिलदार मौदा यांनी दि.२४/०२/१९८३ रोजी श्री सूर्यभान बिसन बागडे यांना सर्वे नं. ४८ 'ब' ६.२२ एकर पैकी पूर्वेकडील ३.५० एकर चा ताबा देवून ताबा पावती केली आहे. सदरची ताबापावती केल्याचे रेकॉर्डवरुन दिसून येते.

प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांच्याकडे अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. त्या अपीलास अनुसरुन त्यांनी तहसिलदार मौदा यांना दि. ०२/०९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास माहिती देण्याचे कळविले होते.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज दि. २०/०७/२०१० जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिला होता तथापी अपीलकर्ता यांना विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी दि. ११/११/२०१० रोजी पोस्टाने तलाठी पोफरा यांचेकडून प्राप्त झालेली माहिती पाठविलेली आहे तथापी सदरची माहिती अपीलकर्तास मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. यावरुन असे दिसते की, अपीलकर्ता यांच्या अर्जाची ३० दिवसात माहिती देणेबाबतची जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी कोणतीही दखल घेतलेली नाही त्यामुळे ते माहिती देण्याच्या विलंबास जबाबदार दिसून येतात. तसेच अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक यांचेकडे दि. ३०/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले होते. परंतू सदरच्या प्रथम अपीलाची कोणतीही सुनावणी न घेता उपविभागीय अधिकारी यांनी केवळ तहसिलदार मौदा यांना दि. ०२/०९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास माहिती पुरविणे बाबत सूचना दिलेल्या दिसून येतात. वास्तविक पाहता उपविभागीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली असती तर अपीलकर्तास माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होते. मात्र तशी कार्यवाही उपविभागीय अधिकारी यांनी केली नाही. म्हणून भविष्यात उपविभागीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निकाल देण्याची कार्यवाही करण्याची समज त्यांना देण्यात येत आहे. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तास दि. ११/११/२०१० रोजी पाठविलेली माहिती पुन्हा अपीलकर्तास देणे योग्य होईल तसेच प्रस्तुत प्रकरणातील मूळ नस्ती तहसिलदार रामटेक कडून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी प्राप्त करुन ती नस्ती निरिक्षणासाठी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. अपीलकर्ता यांना निरिक्षणाअंती पाहिजे असलेले कागदपत्रे विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसेच प्रस्तुत प्रकरणातील नस्ती रामटेक तहसिलदार यांचेकडून प्राप्त करुन घेवून ती नस्ती निरिक्षणासाठी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावी. आणि त्या नस्तीतील निरिक्षणाअंती अपीलकर्तास पाहिजे असलेली माहिती तहसिलदार रामटेक यांचे नियंत्रणाखाली विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी अपीलकर्ता यांच्या दि.२०/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखाली केलेल्या अर्जाची माहिती ३० दिवसात उपलब्ध करुन दिलेली नाही व माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब का झाला याचा कोणताही खुलासा तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार यांनी सादर केलेला नाही किंवा विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल कोणतेही समर्थन केलेले नाही म्हणून या विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार हे दोषी आढळून येतात म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) नुसार रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येते सदरच्या शास्तीची वसूली त्यांचे वेतनातून करण्यात येवून ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

३.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४३७/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री तुषारकांत हंसराज बोंबले<br>२५, डोबी सोसायटी, नरेंद्रनगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - १५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना)<br>नागपूर<br>सी. पी. ॲण्ड बेरार शाळेजवळ, रविनगर, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक (कक्ष-१४)<br>मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना) नागपूर<br>सी. पी. ॲण्ड बेरार शाळेजवळ, रविनगर, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. १३/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने जनमाहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत केले.

२. अपीलकर्ता यांनी दि. २२/१२/२००९ च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये संगणक अर्हता परिक्षा सन २००६ ते २००९ पर्यंत सहपत्र -१ मध्ये दिलेल्या मुख्य वनसंरक्षक (कार्य आयोजना), नागपूर या कार्यालयातील कार्यरत किती अधिकारी व कर्मचारी यांनी संगणक अर्हता परिक्षा पास केलेली आहे. त्यांची माहिती नांव, पदनाम व

प्रमाणपत्रासह प्राधिकृत करुन देण्यात यावी तसेच अधिकारी / कर्मचारी यांनी संगणक परिक्षा कोणत्या शासनमान्य संस्थेमधून उत्तीर्ण केलेली आहे. त्याची माहिती नावं, पदनाम व प्रमाणपत्रासह प्राधिकृत करुन देण्याबाबतची माहिती मागितलेली असून सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले दिसून येते. सदर माहिती विहीत मुदतीत मिळाली नाही व अपूर्ण मिळाली म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम दाखल केले. व त्यानंतरही अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहा. वनसंरक्षक कक्ष-१४ माहिती अधिकारी यांनी दि. २९/०५/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना रु २२/- चा भरणा करण्याकरीता कळविले होते व त्यानुसार रु २२/- चा भरणा दि.२९/०५/२०१० ला प्राप्त झाल्याने प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या दि. ०७/०४/२०१० निर्णयाप्रमाणे विषयांकित माहिती सोबत ११ प्रतित (सत्यप्रतीसह) पुरवठा करण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना माहिती मिळण्यास ९ दिवस विलंब झाला असून मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही व उपलब्ध झालेली माहिती ही अपूर्ण व चुकीची आहे. तसेच ज्या कर्मचाऱ्याचे सेवापुस्तक माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नाही त्याचे संगणक परिक्षा उत्तिर्ण होण्याचे प्रमाणपत्र देखील त्यांना मिळणे आवश्यक आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज हा त्यांच्याकडे दि.३०/१२/२००९ ला प्राप्त झाला असून सदरची माहिती ही आस्थापना शाखेशी संबंधीत असल्यामुळे दि.३०/१२/२००९ रोजीच आस्थापना शाखेकडे माहिती मागितली होती. आस्थापना शाखेने त्यांच्याकडे दि.०८/०३/२०१० रोजी माहिती दिली आणि लगेच दि. ०९/०३/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती दिली. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी दि.०७/०४/२०१० रोजी घेण्यात आली व अपीलकर्तास १५ दिवसांचे आत सुधारित माहिती देण्याचे आदेश दिले

म्हणून अपीलीय अधिकारी यांचे आदेशाप्रमाणे माहिती अधिकारी यांनी आस्थापना शाखेकडून सविस्तर माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्तास रु. २२/- ची फी भरणे बाबत दि. १९/०४/२०१० ला कळविले. अपीलकर्ता यांनी दि.२९/०५/२०१० रोजी रु. २२/- फी चा भरणा केल्यानंतर दि. २९/०५/२०१० रोजी अपीलकर्तास सुधारित माहिती दिलेली आहे. आणि त्यावर अपीलकर्ता यांची स्वाक्षरी सुध्दा घेतलेली आहे. असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच त्यांनी आयोगापुढे सांगितले की, ज्या कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक त्यांचेकडे उपलब्ध नाही त्यांचे संगणक परिक्षा उत्तिर्ण होण्याचे प्रमाणपत्र सुध्दा त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही. म्हणून अपीलकर्तास ज्यांचे सेवापुस्तक कार्यालयात उपलब्ध नाही त्यांचे संगणक परिक्षा उत्तिर्ण होण्याचे प्रमाणपत्र देखील उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तास कळविणे संयुक्तिक होईल त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी ज्या कर्मचाऱ्यांचे सेवा पुस्तक त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही याबाबत संगणक परिक्षा उत्तिर्ण होण्याचे प्रमाणपत्र देखील उपलब्ध नाही असे अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने विनामुल्य कळवावे.

२. अपीलकर्ता यांचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि. ३०/१२/२००९ रोजी प्राप्त झालेला आहे परंतू अपीलकर्तास दि. ०९/०३/२०१० रोजी माहिती अधिकारी यांचेकडून माहिती पाठविलेली दिसून येते म्हणजेच तब्बल दोन महिने उशिराने माहिती दिलेली दिसून येते. आस्थापना शाखेकडून सदरचा अर्ज उशिरा प्राप्त झाला असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले म्हणून आस्थापना शाखेतील संबंधीत कर्मचाऱ्यांनी माहिती मुदतीत उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसून येते तसेच माहिती देण्यास विलंब का झाला याचे कोणतेही समर्थन जनमाहिती अधिकारी अथवा आस्थापना शाखेतील संबंधीत कर्मचाऱ्याने

आयोगासमोर सादर केलेले नाही. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ (५) प्रमाणे आस्थापना शाखेतील संबंधीत कर्मचारी यांना जनमाहिती अधिकारी असे समजण्यात येत असून त्यांचेविरुध्द कलम २० (२) खाली विलंबामुळे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

सदरच्या शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४०९/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. सत्यबाई बालकिसन गोडसेलवार<br>मु. पो. ता. लाखांदूर<br>जि. भंडारा | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>राज्य उत्पादन शुल्क, भंडारा<br>डॉ. झाकीर हुसेन वार्ड, तकीया रोड, भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>राज्य उत्पादन शुल्क कार्यालय, भंडारा<br>डॉ. झाकीर हुसेन वार्ड, तकीया रोड, भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ती यांनी दि. ०४/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २०/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी जनमाहिती अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, भंडारा यांचेकडे दि. ३०/०४/२०१० च्या माहिती अर्जान्वये मौजे तई खुर्द, तालुका लाखांदूर, जिल्हा भंडारा येथील सीएल-अनुज्ञप्तीबाबत श्री विनोदकुमार आत्माराम मोदी यांच्या नावे असलेली सीएल अनुज्ञप्ती सौ सत्यबाई बालकिसन गोडसेलवार यांच्या

नावे वर्ग करण्याबाबत दिनांक २२ मार्च २०१० रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, कार्यवाही करण्यात आलेली नसल्यास विलंबाची कारणे, तक्रारकर्त्याची तक्रार साधारणतः किती दिवसात निकाली निघावयास पाहिजे अशाप्रकारची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी, राज्य उत्पादन शुल्क, भंडारा यांनी दि. २०/०५/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ती यांना सदर प्रकरणाचा चौकशी अहवाल चौकशी अधिकाऱ्याकडून प्राप्त झाल्यावर आपणास कळविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.०५/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. २९/०६/२०१० रोजी घेण्यात आली व त्याच दिवशी अपीलकर्तीस कागदपत्रे देण्यात आली. परंतू त्यानंतरही अपीलकर्तीचे समाधान झाले नाही व त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ती यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांनी दिनांक २६/०३/२०१० रोजी तक्रार अर्ज करुन त्या तक्रार अर्जात श्री विनोदकुमार आत्माराम मोदी राह. सौंदड ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया यांचे नावे असलेले मौजा तई, खुर्द ता. लाखांदुर जि. भंडारा येथील देशी दारु विक्रीचे किरकोळ दुकान नमुना सीएल-३ अनुज्ञप्ती क्रमांक ६१ ही वर्ष २००९-१० करीता कार्यरत आहे. ही अनुज्ञप्ती सत्याबाई बालकिसन गोडसेलवार यांचे नावे करुन देण्याच्या मोबदल्यात श्री विनोदकुमार मोदी यांनी अपीलकर्ती यांचेकडून जानेवारी २००६ ते जून २००८ या कालावधीमध्ये वेळोवेळी एकूण रक्कम रुपये ५१०००००/- (एकावन्न लाख) रोखीने घेतलेले आहेत. व अद्यापपर्यंत हे दुकान अपीलकर्ती यांचे नावे केलेले नसून विनोदकुमार मोदी हे टाळाटाळ करीत आहेत. तसेच एकच देशीदारुचे दुकान विनोदकुमार मोदी यांनी दोन व्यक्तींना विकून त्यांची फसवणूक केली असून रक्कम सुध्दा परत करीत नाही. याबबात जिल्हाधिकारी भंडारा, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क, भंडारा, पोलीस अधिक्षक भंडारा यांनी केलेल्या चौकशी अहवालाची प्रत अपीलकर्ती यांना उपलब्ध झाली मात्र योग्य ती चौकशी करण्यात आली नाही असे अपीलकर्ती यांचे म्हणणे आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ती यांचा दि.३०/०४/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे दि.०४/०५/२०१० रोजी प्राप्त झाला असून दि. २०/०५/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तीस माहिती पुरविण्यात आलेली आहे. सदर माहितीत अपीलकर्ती यांचा अर्ज चौकशीसाठी पाठविलेला असून चौकशी झाल्यावर त्याची प्रत जोडून आपणास पुरविण्यात येईल असे नमूद केले आहे. व त्याबाबत जावक रजिस्टरमधे नोंद केल्याची प्रत सुध्दा त्यांनी आयोगापुढे दाखविली.

६. आजच्या सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी अधिक्षक राज्य उत्पादन शुल्क भंडारा यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दि. ०५/०६/२०१० रोजी दाखल करण्यात आले सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. २९/०६/२०१० रोजी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर आहेत. आणि त्याचदिवशी अपीलकर्तीस त्यांच्या तक्रार अर्जानुसार निरिक्षक साकोली यांची चौकशी अहवालाची प्रत उपलब्ध करुन देण्यात आली. आणि अपील निकाली काढले.

सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असेही सांगितले की, प्रस्तुत प्रकरणात झालेला व्यवहार हा श्री विनोदकुमार मोदी व श्रीमती सत्याबाई गोडसेलवार यांनी आपसात केला असून त्यांच्या व्यवहाराशी त्यांच्या कार्यालयाचा काहीही संबंध नाही तसेच मुंबई दारुबंदी कायदा १९५१ नुसार अनुज्ञप्ती कोणत्याही व्यकतीस विकता येत नाही आणि नियम ५८ नुसार सीएल -३ अनुज्ञप्ती ही शासनाची मालमत्ता असल्याने विकता येत नाही. म्हणून सदर प्रकरण हे विनोदकुमार मोदी आणि अपीलकर्ती यांचेतील वैयक्तिक व्यवहार असून तो सदर कार्यालयाच्या अधिकार क्षेत्रात येत नाही.

७. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ती यांच्या दि.३०/०४/२०१० च्या माहितीच्या अर्जाखालील माहिती त्यांना उपलब्ध झालेली आहे म्हणून अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**अपील क्र. १४१२/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री दिलीप वसंतराव धानोरकर<br>२३, गंगोत्री टेनामेन्टस साईनगर, डिगडोह,<br>हिंगणा रोड, नागपूर -१६ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी, वानाडोंगरी<br>तहसिल कार्यालय हिंगणा<br>ता. हिंगणा रोड जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तलाठी<br>तलाठी कार्यालय वडधामना, साझा क्र. ६,<br>झेंडा चौक, वडधामना ता. हिंगणा जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २१/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, कार्यालय वडधामना, ता. हिंगणा जि. नागपूर यांचेकडे दि. १९/०७/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये तलाठी राहात असलेल्या निवासाचा पत्ता व

फोन नंबर, तसेच केंद्र शासनाची आम आदमी विमा योजना मौजा डिगडोह परिसरातील किती नागरीकांना सदर योजनेबाबत माहिती देण्यात येवून त्यांचे किती अर्ज दाखल करुन घेतले त्या नागरकांची नावे, सदर योजनेचा लाभ किती अपघाती मृत्यू व नैसर्गिक मृत्यू पावलेल्या नागरिकांना देण्यात आला, सदर योजना राबण्यिासाठी कोणत्या प्रकारची अंमलबजावणी करण्यात आली त्याबाबत प्रमाणसहीत माहिती तसेच शेतकरी जनता अपघात विमा योजना कार्यक्षेत्रात किती शेतकऱ्यांची नोंदणी केली त्यांची नावे व सदर योजनेच्या शासनाच्या आदेशाची प्रत देण्यात यावी अशी एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. ११/०८/२०१० च्या पत्रान्वये एकूण ५ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांनी सदर माहिती खोटी व अपूर्ण असल्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी, तहसिल कार्यालय हिंगणा जि. नागपूर यांचेकडे दि. २६/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १२/१०/२०१० रोजी देण्यात आला असून त्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी वडधामना यांना अपीलकर्तास तीन दिवसांचे आत विनामुल्य माहिती सादर करावी व जी माहिती रेकॉर्डला आहे ती अपीलकर्तास उपलब्ध करुन द्यावी व जी माहिती आपल्या कार्यालयात उपलब्ध नसेल तसेही अपीलकर्तास कळवावे असे आदेशित केले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. सुनावणीत आज आयोगापुढे अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखाली ज्या माहितीची मागणी जनमाहिती अधिकारी तथा तलाठी वडधामना यांना केली होती ती त्यांना विहीत मुदतीत देण्यात आली नाही व त्यांना उपलब्ध झालेली माहिती ही खोटी व अपूर्ण दिली आहे. आम आदमी विमा योजनेचा किती नागरिकांना फायदा देण्यात आला व त्याचे किती अर्ज दाखल करुन घेण्यात आले त्या नागरिकांची नावे त्यांनी मागितली होती परंतू सदर माहिती उपलब्ध झाल्यानंतर ती अपूर्ण व खोटयास्वरुपाची आढळून आली असे अपीलार्थीने सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, ग्रामपंचायत डिगडोह मार्फत गावांत दवंडी देवून योजनांची माहिती देण्यात आली असून जानेवारी २००८ मध्ये तहसिल कार्यालय हिंगणा येथे सादर करण्यात आलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांनी ग्राम विकास अधिकारी ग्राम पंचायत डिगडोह यांचे दि. १६/११/२०१० च्या पत्राने अशी माहिती दिली की, जानेवारी २००८ मध्ये आम आदमी विमा योजनेची दवंडी ग्रामपंचायतीने दिली याची नोंद दवंडी रजिस्टरमध्ये दिसून येत नाही. म्हणजेच दवंडी दिलेली नाही. त्याचप्रमाणे तहसिलदार हिंगणा यांचेकडे दि.२२/१०/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना असे कळविण्यात आले की, जानेवारी २००८ मध्ये केंद्र शासनाचे आम आदमी विमा योजना अंतर्गत मौजा वडधामना येथील अर्ज निरंक आहेत. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि.११/०८/२०१० रोजी ग्राम पंचायती मार्फत दंवडी दिली आणि आम आदमी विमा योजनेचे तपासलेले अर्ज जानेवारी २००८ मध्ये तहसिल कार्यालय हिंगणा येथे सादर केले परंतू सदर अर्ज निरंक आहेत. यावरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. ११/०८/२०१० रोजी ग्रामपंचायती मार्फत विमा योजनेचे अर्ज जानेवारी २००८ मध्ये तहसिल कार्यालय हिंगणा येथे सादर केले अशी चुकीची माहिती दिलेली दिसून येते. याबाबत जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांना या विसंगती बद्यल विचारले असता त्यांनी असे सांगितले की, स्थानिक चौकशी करुन त्यांनी अपीलकर्ता यांना दि. ११/०८/२०१० च्या पत्रान्वये दवंडी बाबत आणि योजनेबाबत माहिती दिलेली आहे मात्र त्याचा लेखी पुरावा त्यांचेजवळ नाही.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. २६/०८/२०१० रोजी दाखल केले होते. त्यावर दि. २४/०९/२०१० आणि दि. ११/१०/२०१० रोजी यूपीसीने सुनावणी नोटीस पाठवून अपीलकर्ता यांना प्रथम अपीलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविले परंतू अपीलकर्ता गैरहजर होते. त्यानंतर दि. १२/१०/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देवून जनमाहिती अधिकारी यांनी ३ दिवसात अपीलकर्ता यांना माहिती द्यावी असा निर्णय मिळाल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी याआधीच अपीलकर्ता यांना दि. ११/०८/२०१० ला माहिती पाठविल्याचे दिसते.

७. अपीलकर्ता जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना दि. ११/०८/२०१० च्या पत्रान्वये दिलेली माहिती ही चुकीची दिलेली आहे कारण

ग्राम पंचायत डिगडोह मार्फत दवंडी देण्यात आलेली नाही असे ग्राम विकास अधिकारी ग्राम पचांयत डिगडोह यांच्या दि.१६/११/२०१० च्या पत्रान्वये दिसून येते. तसेच तहसिलदार हिंगणा यांचे दि.२२/१०/२०१० च्या पत्रान्वये वडधामना गावामधील केंद्र शासनाचे आम आदमी विमा योजने अंतर्गत कोणतेही अर्ज तहसिलदार यांचे कार्यालयाकडे सादर झालेले नसल्याचे दिसून येते. वरील बाबीवरुन हे स्पष्ट होते की, जनमाहिती अधिकारी यांनी दि.११/०८/२०१० रोजी अपीलकर्ता यांना चुकीची माहिती पाठविलेली आहे केवळ स्थानिक चौकशी करुन माहिती अधिकाराखालील अर्जात माहिती देणे योग्य नाही म्हणून जनमाहिती अधिकाऱ्यांनी केलेले समर्थन मान्य करता येत नाही. या बाबीस जनमाहिती अधिकारी हे दोषी दिसून येतात. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा तलाठी वडधामना सांझा क्र.६ यांनी माहितीच्या अधिकाराखालील अर्जातील वस्तुस्थितीदर्शक माहिती १० दिवसात विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

२. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा तलाठी, वडधामना सांझा क्र. ६ यांनी दि. ११/०८/२०१० च्या पत्राने चुकीची माहिती पाठविली हे सिध्द होते. म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० (१) अन्वये त्यांचेवर रु.५०००/- दंडाची शास्ती लादण्यात येत आहे. या दंडाची रक्कम त्यांचे दरमहाच्या मासिक वेतनातून लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) ". मध्ये जमा करण्यात यावी.

सदरची कार्यवाही तहसिलदार हिंगणा यांनी करावयाची आहे.

३. सदर निर्णयाची प्रत स्वतंत्रपणे योग्य कार्यवाहीसाठी तहसिलदार हिंगणा जि. नागपूर यांचेकडे पाठविण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४१५/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भरत दत्तात्रय जोग<br>२८७-अ, सौजन्य धरमपेठ विस्तार, शिवाजी नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४००१० | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी<br>शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव/प्रधानाचार्य<br>सरस्वती विद्यालय, साउथ इंडियन एजुकेशन सोसायटी, नागपूर<br>शंकर नगर, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १९/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २१/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांच्या तर्फे शिक्षणाधिकारी श्री नैताम हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव/प्रधानाचार्य साउथ इंडियन एजुकेशन सोसायटी यांचेकडे संस्थेबद्यल एकूण ६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. परंतू विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, शिक्षणविभाग जिल्हापरिषद यांचेकडे दि. ०९/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १७/०९/२०१० ला देण्यात येवून दि. २४/०९/२०१० पर्यंत माहिती देण्यात यावी असे आदेश दिले. प्रथम अपीलानंतरही अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती मिळालेली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे अपूर्ण माहिती दिली आहे. व ६ मुद्यांपैकी फक्त दोनच मुद्यांवर माहिती दिलेली आहे. इतर ४ मुद्यांची माहिती त्यांना मिळालेली नाही. तसेच सुनावणीचेदिवशी आयोगासमोर जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.०६/१२/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा प्रधानाचार्य साउथ इंडियन एज्युकेशन सोसायटी सरस्वती विद्यालय नागपूर यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. २४/०९/२०१० च्या पत्रान्वये १ ते ६ मुद्यांची माहिती दिली. तथापी अपीलकर्ता यांना काही माहिती अपूर्ण वाटत असेल तर ती त्यांना पून्हा देण्यात येईल असेही आयोगापुढे सांगितले.

६. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी शिक्षण विभाग जि. प. नागपूर यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांच्या प्रथम अपीलाची सुनावणी दि. ०३/०९/२०१०, दि. १४/०९/२०१०, दि. १८/०९/२०१० या दिवशी घेण्यात आलेली आहे. व प्रथम अपीलाचा निर्णय दि. १८/०९/२०१० रोजी देण्यात येवून त्यात असे नमूद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या अधिकाराखालील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दि.२४/०९/२०१० ला उपलब्ध करुन द्यावी.

७. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दि. २४/०९/२०१० रोजी अपीलकर्ता यांना एकूण ६ मुद्यापैकी दोनच मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामध्ये संस्थेचे सदस्य एवमं पदाधिकारी यांची नावे याची माहिती दिलेली आहे. आणि विद्यार्थ्यांकडून मिळालेल्या फी व डोनेशन याची माहिती दिलेली आहे. म्हणजेच या दोन मुद्यांचीच माहिती दिली असून उर्वरीत ४ मुद्यांची माहिती पूर्णपणे दिलेली नाही.

८. प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०६/१२/२०१० रोजी अपीलकर्ता यांच्या दि.२४/०६/२०१० च्या माहिती अधिकाराच्या अर्जातील उर्वरीत ४ मुद्यांची सविस्तर माहिती अपीलकर्ता यांना व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्याची आयोगासमोर संमती दिली म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा प्रधानाचार्य साउथ इंडियन एज्युकेशन सोसायटी नागपूर यांनी अपीलकर्ता यांना माहिती अर्जातील उर्वरीत ४ मुद्यांची संपूर्ण माहिती दि. ०६/१२/२०१० रोजी व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी नुसार ३० दिवसात अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही असे दिसून आले त्यामुळे माहिती देण्याच्या विलंबाबाबत त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात असा विलंब झाल्यास त्याची गंभीर दखल घेवून त्यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४३२/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राधेश्याम परसरामजी काबरा<br>शिवाजी वार्ड, मु. पो. देसाईगंज<br>ता. देसाईगंज जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०६/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २२/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्या वतीने नायब तहसिलदार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, जमीन शाखा जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली यांचेकडे दि.१६/०४/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज करुन एकूण १६ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, गडचिरोली यांचेकडे दि.२९/०५/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२३/०७/२०१० रोजी देण्यात आला. त्यानुसार अपीलकर्ता यांना १० दिवसात जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेशित केले परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. परंतू प्रथम अपीलाच्या दि. २३/०७/२०१० च्या निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दि.०२/०८/२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू सदर माहितीतील काही मुद्दे हे नकारार्थक स्वरुपाचे असल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता हे सुनावणीचेवेळी उपस्थित नसल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. आजच्या सुनावणीस जनमाहिती अधिकारी यांचे वतीने हजर असलेले नायब तहसिलदार श्री राचेलवार यांनी कागदपत्रे दाखल केली व आयोगापुढे युक्तिवाद करतांना सांगितले की, अपीलकर्ता यांना दि. २४/०५/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविण्यात आलेली आहे त्या पत्राचा जावक क्र. ४२६ असून ते पत्र त्यांनी आयोगापुढे दाखविले.

तसेच अपीलकर्ता यांनी एकूण १७ मुद्यांवर मागितलेली माहिती ही प्रश्नाच्या स्वरुपात विचारलेली आहे त्यामुळे मागितलेली माहिती ही गुंतागुंतीची व क्लीष्ठता निर्माण करणारी असून प्रत्येक मुद्यांवर प्रश्न व त्याचे उपप्रश्न या स्वरुपात माहितीची विचारणा केलेली आहे. अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलाचा निर्णय दि.२३/०७/२०१० रोजी देण्यात आला असून त्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्तास १० दिवसात संपूर्ण कागदपत्रासह माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिले सदर

निर्णयानंतर अपीलकर्ता यांना दि.०२/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविलेली आहे असे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही परंतू जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे केलेला युक्तिवाद यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असून त्या प्रश्नांमध्येच काही उपप्रश्न आहेत. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डवरुन अपीलकर्ता यांना दि. २४/०५/२०१० व दि.०२/०८/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे, त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र. १४०१/नाग/२०१०**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री फैजान अख्तर व. अब्दुल खालीक<br>हन्डी ओली, गुजरी बाजार, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग)<br>जिल्हा परिषद नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १८/११/२०१०)**

**नि र्ण य**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २०/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे शासकीय दौऱ्यावर असल्यामुळे ते गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि. ०३/०८/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये २०००-०१ ते २००९-१० पर्यंतची राष्ट्रीय उर्दु

उच्च प्राथमिक शाळा कामठी यांच्या संबंधीत ऑडीट रिपोर्ट, फायनानशियल स्टेटमेंट ची सत्यप्रत तसेच दि.२८/०६/२०१० ला मा. शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद नागपूर यांच्या निर्णयानुसार मुख्याध्यापिका तथा माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागितल्या प्रमाणे प्रत सादर करण्याचा आदेश दिला त्या आदेशानुसार राष्ट्रीय उर्दु प्राथमिक शाळेमध्ये प्रत जमा केली त्या आदेशाची सत्यप्रत देण्यात यावी अशी माहिती मागितलेली असून सदर माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. १६/०१/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्तास मुद्या क्र. १ ची माहिती शाळेशी संबंधीत असल्यामुळे मुख्याध्यापिका यांना सदर अर्जाची प्रत पाठविण्यात येत आहे व मुद्या २, ३ ची माहिती या कार्यालयाला प्रती पान २/- रुपये प्रमाणे ४ पानांसाठी रु. ८/- चा भरणा लेखाशिर्षात जमा करण्याबाबत कळविलेले आहे. तसेच चालान भरल्यानंतर त्या चालानची प्रत श्रीमती नाईक क. सहा. यांचेकडे जमा केल्यावर पाहिजे असलेली माहिती एक आठवडयाचे आत कार्यालयाकडून घेऊन जावी असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. ०२/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. २१/०९/२०१० रोजी देण्यात आला असून त्यामध्ये माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमिक शाळा नया बाजार शिवपंचायत नगर, कामठी यांनी अपीलकर्ता यांना मागितलेली माहिती १ आठवडयाचे आत देऊन त्याची १ प्रत या कार्यालयास सादर करावी असे आदेश दिले आहे. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही व त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, त्यांना मुद्या क्र. २ व ३ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे परंतु मुद्या क्र. १ ची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथ) तथा प्रथम अपीलीय अधिकारी जि. प. नागपूर यांचेकडे दि. ०२/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानुसार अपीलकर्ता यांना दि. १३/०९/२०१० रोजी ४ पानांची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

५.	आजच्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ) जि. प. नागपूर यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा दि. ०३/०८/२०१० चा अर्ज त्यांच्याकडे दि. १६/०८/२०१० प्राप्त झाला. त्या अर्जातील मुद्या क्र. १ ची माहिती मुख्याध्यापक राष्ट्रीय उर्दु प्राथमिक शाळा शिवपंचायत नगर कामठी जिल्हा नागपूर यांचेशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्ता यांना त्या मुद्याची माहिती देणेबाबत मुख्याध्यापकांना कळविले आणि मुद्या क्र. २ व ३ ची माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे अपीलकर्ता यांचेकडून रु ८/- चे शुल्क घेऊन त्यांना उपलब्ध करुन दिली. मात्र मुद्या क्र. १ ची माहिती मुख्याध्यापक राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमिक शाळा यांनी अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२१/०९/२०१० रोजी निर्णय देऊन मुख्याध्यापक राष्ट्रीय उर्दु प्राथमिक शाळा शिवपंचायत नगर कामठी जिल्हा नागपूर यांना १ आठवडयाच्या आत माहिती देणे बाबत आदेशित केले. सदर शाळा ही शासन अनुदानीत असल्याने अपीलकर्ता यांना माहिती देणे आवश्यक आहे तथापी मुख्याध्यापक माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याचे दिसून येते असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

६.	अपीलकर्ता, प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. २ व ३ ची माहिती उपलब्ध झाली आहे. मात्र मुद्या क्र. १ ची माहिती राष्ट्रीय उर्दु उच्च प्राथमिक शाळा नया बाजार शिवपंचायत नगर कामठी यांचेशी संबंधीत असल्यामुळे आणि सदरची शाळा शासन अनुदानीत असल्याने मुख्याध्यापकांकडून जनमाहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन अपीलकर्तास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथ) जिल्हा परिषद नागपूर यांनी मुख्याध्यापक राष्ट्रीय उर्दु उच्च (प्राथ) शाळा कामठी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेवून अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने पाठवावी.

२) तसेच सदरची शाळा शासन अनुदानीत असल्यामुळे मुख्याध्यापक राष्ट्रीय उर्दु उच्च (प्राथ) शाळा कामठी नागपूर यांचेकडून जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांनी मुदतीत माहिती प्राप्त करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी. अन्यथा जनमाहिती अधिकारी यांचेवर शास्तीची कार्यवाही करण्यात येईल.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४३५/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजेश दिगंबरराव भंडारी<br>१७४, विजयानंद सोसायटी, नरेन्द्र नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ०१५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक<br>आनंदाबाई विद्यालय किटाडी<br>ता. लाखांदूर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>आनंदाबाई विद्यालय किटाडी<br>ता. लाखांदूर जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि.१४/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २२/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, द्वारा आनंदाबाई विद्यालय किटाडी, ता. लाखांदूर, जिल्हा भंडारा यांचेकडे दि. १२/०६/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली सन १९९०-१९९१ पासून सन ३१ मे २०१० पर्यंत शाळेच्या एकूण वेतनेतर अनुदानाबाबत व मे १९९२ पासून शाळेचे प्रलंबित भाडे व शाळेवरील खर्चाबाबत एकूण ११ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती रजिस्टर पोस्टने घेणार असे नमूद केले आहे.

३.    अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे दि. ०१/११/२०१० च्या पत्रान्वये त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिल्याचे दिसून येते. तथापी या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक आनंदाबाई विद्यालय किटाडी, ता. लाखांदूर जि. भंडारा यांचेकडे दि. २१/०७/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यानंतरही त्यांना संपूर्ण माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.    अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मुदतीत मिळाली नाही. तथापी त्यांना दि. ०१/११/२०१० च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली परंतू सदर माहिती ही अपूर्ण स्वरुपात आहे. त्यामुळे त्यांनी पूर्ण माहिती मिळण्यासाठी द्वितीय अपील केल्याचे आयोगासमोर सांगितले.

५.    सुनावणीचेवेळी जनमाहिती अधिकारी हे हजर असून त्यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना शाळेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती दि. ०१/११/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली आहे व त्याची पोच सुध्दा जोडलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना मिळाल्याची कबूली सुनावणीचेवेळी त्यांनी दिली.

६.    अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या दि. १२/०६/२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जात एकूण १ ते ११ मुद्यांची माहिती मागितलेली आहे परंतू काही मुद्ये हे प्रश्नार्थक स्वरुपाचे दिसून येतात. तथापी जनमाहिती अधिकारी आनंदाबाई विद्यालय किटाडी, ता. लाखांदूर जि. भंडारा यांनी जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांना जी माहिती प्राप्त झालेली आहे त्यामध्ये त्यांना इमारत मालकास सन १९९०-९१ ते सन १९९५-९६ मध्ये इमारत भाडे रु ६३८५/- अदा केलेले आहेत हे अदा केलेले भाडे ज्या महिन्यात अदा करण्यात आलेले आहेत. त्या महिन्याच्या कॅश बुकच्या प्रती त्यांनी मागितलेल्या आहेत. म्हणून अपीलकर्ता व माहिती अधिकारी यांच्या संमतीने असे ठरविण्यात आले की, इमारत मालकास दिलेल्या इमारत भाडयाच्या नोंदीच्या झेरॉक्स प्रती विनामुल्य अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात येतील.

त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी आनंदाबाई विद्यालय किटाडी ता. लाखांदूर जि. भंडारा यांनी इमारत मालकास इमारत भाडेपोटी दिलेल्या रकमेच्या नोंदीच्या कॅशबुकच्या झेरॉक्स प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात. त्यासाठी अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेशी स्वतः संपर्क साधावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४३४/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुधाकर आत्मारामजी थुटे<br>मु.पो. वहानगांव<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती चिमुर<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्रामपंचायत वहानगांव<br>ता. चिमुर जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २४/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि.०८/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २२/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत वाहनगांव यांचेकडे दि. १५/०५/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जलस्वराज योजने अंतर्गत २००६ ला मंजुरी प्राप्त झालेल्या पाण्याच्या टाकीचे बांधकामाबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केलेले आहे.

३. अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत वाहनगांव यांनी अपीलकर्ता यांना दि.१४/०६/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते परंतू सदर माहिती ही विहीत मुदतीत मिळाली नाही व उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी (उ.श्रे.) पंचायत समिती चिमुर यांचेकडे दि.१४/०६/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ३०/०७/२०१० रोजी देण्यात आला त्या निर्णयात अर्जदारास माहिती मिळालेली आहे व उर्वरीत माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे देता येत नाही व शासकीय योजनेत बांधण्यात आलेल्या विहीरीवरील पाण्याचा वापर होत असल्यामुळे पंप बंद करण्याची कार्यवाही करण्याबाबत सचिव ग्रामपंचायत वहानगाव यांना आदेश देण्यात येत आहे असे नमूद करुन अपील फेटाळलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या या निर्णयामुळे अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या अर्जानुसार त्यांना दि. १४/०६/२०१० रोजी माहिती प्राप्त झाली मात्र त्या माहितीमध्ये नळ योजना जमाखर्चाचा एकूण तपशील रु. ७३९६३५/- असा देण्यात आला आहे. परंतू या खर्चामध्ये नेमका विहीरीचा खर्च किती, पाईप लाईनचा खर्च किती व पाण्याच्या टाकीचा खर्च किती हे खर्च स्वतंत्रपणे देण्यात आलेले नाही म्हणून हे तीनही खर्च स्वतंत्रपणे देण्यात यावे असे अपीलकर्ता यांनी सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत वाहनगाव व प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांना दि. १४/०६/२०१० ला माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. व त्या माहितीमध्ये नळ योजना जमा खर्च याचा तपशील दिलेला आहे. मात्र अपीलकर्ता यांनी विहीर, पाईपलाईन, आणि टाकी यांचा स्वतंत्रपणे खर्च पाहिजे असल्यास तो ही स्वतंत्रपणे देण्यास आम्ही तयार आहोत असे सांगितले.

यावरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना नळयोजनेच्या जमाखर्चाची माहिती मिळालेली आहे परंतू त्यासंबंधीत विहीर व पाईपलाईन आणि पाण्याची टाकी या संबंधीतची माहिती मिळालेली नाही. तेव्हा अपीलकर्ता

यांना विहीर, पाईपलाईन व टाकी यासंबंधीत असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी नळ योजनेत झालेल्या खर्चापैकी विहीरीवर खर्च किती, पाईपलाईनवर झालेला खर्च किती आणि टाकीवर झालेला खर्च किती याचा तपशिल स्वंतत्रपणे विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्यावा.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र................दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र. १४४०/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री डॉ. रविंद्र शामराव वासनिक<br>डॉ. आंबेडकर मार्ग, पंजाब नॅशनल बँक जवळ, इंदोरा चौक, नागपूर<br>ता. जि. नागपूर -१७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप धर्मदाय आयुक्त<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि.१२/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी जनमाहिती अधिकारी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. ०३/०७/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचेकडे ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय नागपूर यांनी दि.०२/०१/२०१० च्या पत्रान्वये मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांची रिट याचिका क्रमांक ५२९४/०८ व ५१३२/०८ मध्ये अनुक्रमे दिनांक २८/०४/२००९ व २०/०८/२००९ चे निर्णयानुसार संस्था / न्यासांना माहितीचा अधिकार कायदा लागू होत नाही त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांना विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय सह आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय नागपूर यांचेकडे दि.२१/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी सुनावणीचेवेळी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे त्यांनी मागितलेली माहिती मुदतीत उपलब्ध झाली नाही. त्यामुळे अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. दरम्यानच्या काळात ४ महिन्यानंतर दि. २४/१०/२०१० रोजी माहिती पाठविली परंतू सदर माहिती ही एकाच मुद्याची मिळाली इतर २ मुद्यांची माहिती मिळालेली नाही असे अपीलकर्ता यांचे म्हणणे आहे.

५.	जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले की, त्यांच्याकडे दि. ०२/०७/२०१० रोजी अपीलकर्ता यांचा अर्ज प्राप्त झाला त्यावेळी त्यांची नियुक्ती ही नुकतीच त्या पदावर झाली होती इतर दोन अतिरिक्त पदांचा पदभार त्यांच्याकडे आहे त्यामुळे कार्यालयात उपलब्ध असलेल्या माहितीवरुन अपीलकर्ता यांना दि. २२/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती पाठविलेली आहे. अपीलकर्ता यांना ज्या दोन मुद्यांची माहिती द्यावयाची आहे त्याचा शोध घेण्याचे काम सुरु आहे सदर माहिती प्राप्त होताच अपीलकर्ता यांना तातडीने देण्यात येईल. सदरची माहिती उपलब्ध झाल्यानंतर अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्याचे सांगितले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुद्दा क्र. B व मुद्दा क्र. C ची माहिती विनामुल्य किंवा व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

## मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.

**<u>अपील क्र. १४३६/नाग/२०१०</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री गुलजार उस्मान कुरेसी<br>मु. डोंगरताल पो. देवलापार<br>ता. रामटेक जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तहसिलदार रामटेक<br>ता. रामटेक जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २५/११/२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

१. अपीलकर्ता यांनी दि.१३/१०/२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि. २६/१०/२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २५/११/२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत यूपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दि. १६/०७/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये मौजा डोंगरताल येथील कब्रस्थान व लाल दिवान दर्गावर आला हजरत अली बाबा लाल दिवानशा सेवा ट्रस्ट २१५० चा अवैध ताबा समाप्त करण्याबाबतची माहिती मागितली असून माहिती शिघ्र टपालाने घेणार असे नमूद केलेले दिसून येते.

३.	अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दि. २२/०९/२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू सदर माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दि. १६/०९/२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपेक्षित माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले की, मौजा डोंगरताल येथील कब्रस्तान व लाल दिवाण दर्ग्यावर सेवा ट्रस्टने अवैधीत ताबा केलेला आहे त्याबाबतची माहिती त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे मागितली होती तथापी त्यांना समाधानकारक माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

५.	जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. १६/०७/२०१० चा माहितीचा अर्ज हा तलाठी डोंगरताल यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी तलाठी डोंगरताल स.जा. क्र.३० यांचेकडे मौका चौकशीसाठी पाठविला आहे त्यानुसार दि. २३/०७/२०१० रोजी मौका चौकशी अहवाल प्राप्त झाला. त्यानंतर अपीलकर्ता हे कार्यालयात आले त्यांना मौका चौकशी अहवाल आणि ट्रिब्यूनल नागपूर यांच्या आदेशाची प्रत दाखविली आणि त्यांना सदरच्या आदेशाची प्रत घेवून पोच देणे बाबत विनंती केली. मात्र अपीलकर्ता यांनी ती माहिती घेतली नाही म्हणून अपीलकर्ता यांना दि. २२/०९/२०१० रोजी माहिती पोस्टाने पाठविली. सदर माहिती मिळाल्याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगासमोर कबुल केले.

६.	अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते आणि सदरची माहिती अपीलकर्तास मिळाल्याची कबुली अपीलकर्ता यांनी आयोगासमोर दिली. म्हणून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक...............**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**